# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ८२ वी बैठक

| बैठक दिनांक | २०.१०.२०२३ |
|---|---|
| ठिकाण | हॉटेल व्हिट्स, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद |
| वेळ | सकाळी:- ११:०० |

## बैठकीचे इतिवृत

**विषय क्रमांक:-१** सन्माननीय सदस्यांच्या रजेबाबत.

**ठराव क्रमांक:-१** श्रीमती फौजिया तेहसीन अहमद खान, मा. राज्यसभा सदस्य तथा सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांची रजा मंजूर करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक:-२** दिनांक ३० ऑगस्ट-२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

**ठराव क्रमांक:-२** दिनांक ३० ऑगस्ट-२०२३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

## (नोंदणी विभाग)

**विषय क्रमांक:-३** वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार नोंदणी प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.

अ) वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या नोंदणीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकुण (७८) प्रस्तावांची यादी खालीलप्रमाणे आहे :-

| Sr. No | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ABD/396/2018 | Madarsa Talimul Quraan Makka Masjid | At. Jamal Shah Colony | Sillod | Sillod | Aurangabad |
| 2 | ABD/86/2023 | Madarsa Masjid-E-Rasool | | Gadhegaon Gangapur | Paithan | Aurangabad |
| 3 | ABD/92/2023 | Masjid E Ghaus O Raza wa Madarsa Darul Uloom Ahle Sunnat Imam Ahmad Raza | At. Gut No. 2, Chishtiya Colony | Shahjapur | Aurangabad | Aurangabad |
| 4 | JLN/22/2 | Masjid-E-Abubakar-wo- | Situated at | Bhokardha | Bhokardh | Jalna |

| Sr. No | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| | 018 | Arbi Madrsa | Property No. (New) 4775, Rafique Colony | n | an | |
| 5 | JLN/650/2018 | Madina Masjid | | Muthad | Bhokardhan | Jalna |
| 6 | JLN/144/2022 | Jamiya Umme Salam (Razi) Madarsa | | Babulgaon | Bhokardhan | Jalna |
| 7 | JLN/484/2022 | Ashoorkhana Muslim Panch Committee | | Leha | Bhokardhan | Jalna |
| 8 | JLN/485/2022 | Jama Masjid | | Leha | Bhokardhan | Jalna |
| 9 | JLN/1192/2022 | Jama Masjid | | Wakdi | Bhokardhan | Jalna |
| 10 | JLN/220/2023 | Darul Uloom Faizan-E-Tajushshariya and Gaus-E-Azam Masjid | | Kathora Bajar | Bhokardhan | Jalna |
| 11 | JLN/939/2023 | Jama Masjid | At. Borgaon Taru | Boargaon | Bhokardhan | Jalna |
| 12 | JLN/945/2023 | Jama Masjid | | Somthana | Badnapur | Jalna |
| 13 | JLN/946/2023 | Kabrastan | At. Borgaon Taru | Boargaon | Bhokardhan | Jalna |
| 14 | BED/564/2023 | Bilal Madarsa Masjid | | Sonijawala | Kaij | Beed |
| 15 | PBN/293/2017 | Arbiya Masjid Abubakar Siddiqui | At. Sevak Nagar | Parbhani | Parbhani | Parbhani |
| 16 | LTR/170/2022 | Dargah Sharif Maheboob Subhani (Kabrastan) | | Wadi (shedol) | Nilanga | Latur |
| 17 | LTR/581/2022 | Masjid | | Wadi (shedol) | Nilanga | Latur |
| 18 | OSD/636/2019 | Jama Masjid | | Trikoli | Umarga | Osmanabad |
| 19 | OSD/638/2019 | Muslim Samaj Idgah | | Trikoli | Umarga | Osmanabad |
| 20 | OSD/207/2023 | Jama Masjid and Dini Madarsa | | Hinglajwadi | Osmanabad | Osmanabad |
| 21 | OSD/275/2023 | Masjid-E-Eliyas and Deeni Madarsa | At. Karim Nagar | Osmanabad | Osmanabad | Osmanabad |
| 22 | THN/783/2022 | Sunni Muslim Kabrastan | | Kalyan | Kalyan | Thane |
| 23 | RGD/406/2023 | Madarsa-wo-Masjid Jamatul Muslimin | | Ravdhal | Mahad | Raigad |
| 24 | RGD/611/2023 | Rabbani Mohalla Masjid | | Saigaon | Shrivardhan | Raigad |
| 25 | PUN/940/2022 | Jama Masjid & Kabrastan Committee | | Kothale | Purandar | Pune |
| 26 | PUN/03/2023 | Masjid-E-Umar Farooq | At. Kalwad Wasti, Lohgaon Road | Lohgaon | Haveli | Pune |
| 27 | PUN/144/2023 | Masjid-E-Saad | Tamhane Wasti | Chikli | Haveli | Pune |
| 28 | SLR/292/2023 | Sarv Muslim Samaj Kabrastan | | Ingalgi | S.Solapur | Solapur |
| 29 | SLR/394/2023 | Tarapur Muslim Jamat Idgah, Kabrastan, | | Tarapur | Pandharpur | Solapur |

| Sr. No | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Masjid Waqf | | | | |
| 30 | SGL/191/ 2023 | Jama Masjid Muslim Jamiyat and Kabrastan | | Kundalwad i | Walwa | Sangli |
| 31 | STR/1134 /2022 | Jama Masjid | | Taradgaon | Phaltan | Satara |
| 32 | STR/258/ 2023 | Jubeda Masjid | | Malharpeth | Patan | Satara |
| 33 | NSK/508/ 2023 | Nagina Masjid Trust | At. Jamdhade Chowk | Manmad | Nandgaon | Nashik |
| 34 | JGN/1113 /2010 & 642/2016 | Arbiya Masjid | | Mahalpur | Parola | Jalgaon |
| 35 | AMT/963 /2017 | Madina Masjid Trust | | Thugaon Pimpri | Chandur Bazar | Amravat i |
| 36 | AMT/509 /2018 | Masjid -E- Aqsa And Madarsa | S.T. Stand Road Taj Nagar Warud | Warud | Warud | Amravat i |
| 37 | AMT/410 /2022 | Raza Masjid Ahele Sunnat | | Kalamkhar | Dharni | Amravat i |
| 38 | AMT/425 /2022 | Masjid-E-Quba | At. Bhatt Plot | Chandur Bazar | Chandur Bazar | Amravat i |
| 39 | AMT/517 /2022 | Raza Masjid Ahele Sunnat Dharni | | Dharni | Dharni | Amravat i |
| 40 | AMT/570 /2022 | Noori Masjid Ahle Sunnat wal Jamat | | Khaparkhe da | Dharni | Amravat i |
| 41 | AMT/93/ 2023 | Mehboobiya Muslim Kabrastan | Manzur Pura | Naubag | Achalpur | Amravat i |
| 42 | AMT/304 /2023 | Kabrastan | Malkapur | Shendurjan a Ghat | Warud | Amravat i |
| 43 | AMT/306 /2023 | Masjid Umar Farooque | At. Gitti Khadan, Dargah Mohalla | Morshi | Morshi | Amravat i |
| 44 | AMT/463 /2023 | Ahle Sunnat wa Jamat Hanafi Barelvi Ghausiya Masjid | Ward No. 03 | Roshankhe da | Warud | Amravat i |
| 45 | AMT/563 /2023 | Arbi Madarsa Chishtiya Sabriya Nakshbandiya Sunni Masjid | At. Bichhu Tekdi, Islampura | Amravati | Amravati | Amravat i |
| 46 | AMT/566 /2023 | Sunni Masjid e Auliya | Kabeer Colony | Akhad wada | Teosa | Amravat i |
| 47 | AKL/234/ 2017 | Dargah-O-Madina Masjid | | Ridhora | Balapur | Akola |
| 48 | AKL/275/ 2021 | Arbi Madarsa & Masjid-E-Tayyaba | At. Railway Station Road | Gaigaon | Balapur | Akola |
| 49 | AKL/469/ 2021 | Noor Mohammad Masjid-O-Madarsa | At. Malak Tujjar Plot | Akot | Akot | Akola |
| 50 | AKL/315/ 2022 | Shams Arbi Madarsa va Masjid | | Hatrun | Balapur | Akola |
| 51 | AKL/378/ 2022 | Masjid-E-Gulshan-E-Garib Nawaz | At. CTS No. 8, Plot No. 20/1/LP3, Sailani Nagar | Akola | Akola | Akola |
| 52 | AKL/383/ 2022 | Madina Masjid | | Hata | Balapur | Akola |
| 53 | AKL/886/ 2022 | Madarsa Abuhuraira (Masjid-E-Makka) | | Mohala | Akot | Akola |
| 54 | AKL/73/2 | Masjid-E-Bilal | | Akolkheda | Akot | Akola |

| Sr. No | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| | 023 | | | | | |
| 55 | AKL/94/2023 | Masjid Raza-e-Mustafa Sunni Hanfi Barelwi (Maslak-e-Aala Hazrat) | At. K.G.N. Nagar | Akot | Akot | Akola |
| 56 | AKL/95/2023 | Masjid-E-Aabida-O-Madarsa (Ahle Sunnat-o-Jamat Maslake Ala Hazrat) | At. Gulshan Nagar | Akot | Akot | Akola |
| 57 | BLD/219/2012 | Quwatul Islam Panch Mandal Masjid | At. Sonaji Nagar | Sonala | Sangrampur | Buldhana |
| 58 | BLD/423/2021 | Masjid-E-Gareeb Nawaz (Ahle Sunnat Wal Jamat) | At. Indira Nagar | Sagwan | Buldhana | Buldhana |
| 59 | BLD/451/2022 | Madina Masjid | -- | Pimpalgaon Bk. | Deulgaon Raja | Buldhana |
| 60 | BLD/655/2022 | Masjid-Wo-Madarsa Darussalam | | Khel Paraskar (Jamod) | Jalgaon Jamod | Buldhana |
| 61 | BLD/85/2023 | Nabvi Madarsa wo Masjid | | Umbarkhed | Deulgaon Raja | Buldhana |
| 62 | BLD/156/2023 | Masjid-E-Haroon Ahle Hadees | | Mehkar | Mehkar | Buldhana |
| 63 | WSM/785/2010 | Masjid Ibrahim | At. Vakil Colony, Darwha Road | Karanja | Karanja | Washim |
| 64 | WSM/531/2021 | Hazrat Abu Hurera Jama Masjid | | Kolgaon Bk. | Malegaon | Washim |
| 65 | WSM/638/2022 | Madarsa and Masjid Hussainiya | | Surkandi | Washim | Washim |
| 66 | WSM/688/2022 | Kabrastan | Giroli Bagh-2 | Giroli | Manora | Washim |
| 67 | WSM/116/2023 | Jama Masjid | Gut No. 596 | Vyad | Risod | Washim |
| 68 | YTM/335/2009 & 466/2022 | Madina Arabi Madarsa and Masjid | At. Rajiv Nagar | Bori Khurd | Darwha | Yavatmal |
| 69 | YTM/229/2010 | Masjid Aqsa | | Sindhi | Darwha | Yavatmal |
| 70 | YTM/463/2022 | Muhammadiya Arabi Madarsa and Masjid | -- | Bori Khurd | Darwha | Yavatmal |
| 71 | YTM/634/2022 | Masjid-E-Salim | At. Gurudev Nagar | Dhanki | Umerkhed | Yavatmal |
| 72 | YTM/654/2022 | Masjid us Salam-wo-Madarsa Darussalam Pandharkavda | At. Ashiyana Colony | Pandharkavda | Kelapur | Yavatmal |
| 73 | YTM/948/2022 | Faiz -E- Abdulla Masjid | At. Jyotiba Phule Nagar, Ward No.9 | Dhanki | Umerkhed | Yavatmal |
| 74 | YTM/184/2023 | Masjid Markaz-E-Islami | At. Sai Nagar | Wani | Wani | Yavatmal |
| 75 | NGP/851/2015 | Ahle Sunnat Masjid Madarsa Intejamiya Kameti | At. Ward No. 1 | Bhanegaon | Savner | Nagpur |
| 76 | NGP/253/2023 | Jama Masjid Madarsa wa Kabrastan Trust | | Uparwahi | Kalameshwar | Nagpur |
| 77 | WRD/480 | Gausiya Masjid and | | Junona | Seloo | Wardha |

| Sr. No | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| | /2022 | Madarsa | | | | |
| 78 | WRD/89/ 2023 | Markaz Ahle Sunnat wa Jamat Arbi Madarsa | At. Near Rustam Manzil, Turak Layout, Mominpura | Wardha | Wardha | Wardha |

उपरोक्त प्रकरणे या कार्यालयाने तपासली उपरोक्त प्रकरणात मा. कोर्टात कोणतेही वाद लवाद प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले नाही. सदर संस्थांची नोंदणीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

ब) वक्फ अधिनियम १९९५ हा कायद दि. ०१.०१.१९९६ पासून संपुर्ण देशभरात अंमलात आलेला आहे. सदर कायदा अंमलात येण्यापुर्वी धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या वक्फ संस्थांची मानिव नोंदणी करणे बाबत वक्फ अधिनियम मधील कलम ४३ अन्वये तरतुद करण्यात आलेली आहे. काही वक्फ संस्था धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे सन १९९६ नंतर नोंदणीकृत करण्यात आलेल्या असून वक्फ अधिनियम अंमलात आल्यानंतर सदर वक्फ संस्थांच्या मुळ धारिका धर्मादाय कार्यालयाने वक्फ मंडळाकडे हस्तांतरित केलेल्या आहे. सदर संचिकेतील कागदपत्रे पाहता सदर संस्था वक्फ असल्याचे स्पष्ट होते. सबब वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ४०(३) नुसार सदर वक्फ संस्था वक्फ घोषीत करुन त्यांची नोंदणी या कार्यालयाकडे नोंदणी करावयाचे प्रस्तावित आहे.

| Sr. No. | File No. | Name Of Wakf Institution | Address | Village | Taluka | District |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ADR/387/2 017 | Khaki Peer Dargah Asif Masjid & Kabrastan Trust | Walunj, Bhabhuri Ghumat | Walunj | Ahmedn agar | Ahmedn agar |
| 2 | RGD/606/ 2022 | Jamatul Muslimeen Masjid Trust, | Kondivat | Kondivat | Mahad | Raigad |
| 3 | AMT/499/ 2017 | Madina Masjid | | Marda | Teosa | Amravati |

**ठराव** क्रमांकः-**३** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार उपरोक्त एकुण (८१) नोंदणीच्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त परिशिष्ट अ व ब येथे नमूद नोंदणीच्या एकुण (८१) प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे.**

विषय क्रमांकः-**४** **वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ४० अंतर्गत चौकशीबाबत**

एखादी मालमत्ता वक्फ आहे किंवा नाही हे ठरविण्याचे अधिकार वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ४० नुसार वक्फ मंडळास आहेत. सदर तरतुद खालीलप्रमाणे आहे :-

**40. Decision if a property is waqf property.—**

(1) **The Board may itself collect information** regarding any property which it has reason to believe to be waqf property and if any question arises whether a particular property is waqf property or not or whether a 1waqf is a Sunni waqf or a Shia waqf, it may, after making such inquiry as it may deem fit, decide the question.

(2) The decision of the Board on a question under sub-section 1 shall, unless revoked or modified by the Tribunal, be final.

(3) Where the Board has any reason to believe that any property of any trust or society registered in pursuance of the Indian Trusts Act, 1882 (2 of 1882) or under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or under any other Act, is waqf property, **the Board may notwithstanding anything contained in such Act, hold an inquiry in regard to such property** and if after such inquiry the Board is satisfied that such property is waqf property, call upon the trust or society, as the case may be, either to register such property under this Act as waqf property or show cause why such property should not be so registered:

कलम ४० अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबतची कार्यपद्धती वक्फ रुल्स, २०२२ मधील नियम क्र. १८ मध्ये विषद करण्यात आलेली आहे. नियम क्र. १८ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे :-

**18. Manner of enquiry under section 40 of the Act.-**

(1) The Chief Executive Officer shall collect the information for the purpose of sub-section (1) of section 40 of the Act in Form 11.

(2) The enquiry under sub-section (3) of section 40 of the Act by the Chief Executive Officer shall be as laid down in sub-rules (5) and (6) of rule 17.

(3) The Chief Executive Officer after obtaining orders from the Board shall,___

(a) call upon the Trust or Society, as the case may be to register any property as Waqf property in Form 12;

(b) issue a Show-cause Notice in Form 13;

(c) proceed with the enquiry following the procedure as laid down in sub-rule (5) and (6) of rule 17;

कलम ४० व नियम १८ विचारात घेता, मा. मंडळाच्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावयाची आहे. प्रत्येक मालमत्तेच्या चौकशीपुर्वी मा. मंडळाची मान्यता घेणे, तद्नंतर चौकशी करणे व चौकशी अहवाल मंडळासमोर सादर करणे यामध्ये अनावश्यक विलंब होतो. सबब, कलम ४० व नियम १८ अंतर्गत सर्व प्रकरणांसाठी चौकशीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असे प्रस्तावित आहे.

**ठराव क्रमांक:-४ वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ४० येथील तरतुदीनुसार व वक्फ रुल्स २०२२ मधील नियम १८ अंतर्गत सर्व प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांची विशेष चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक:-५** वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ४० अंतर्गत चौकशीबाबत

**संचिका क्र. ४०/५४/१२**

**मस्जिद दुधारी उर्फ कथडा उर्फ कागजीपुरा मस्जिद ट्रस्ट, नाशिक.**

**विरुध्द**

**उत्तम नभाजी महाले व इतर**

सदरहु संचिकामध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे वक्फ अपिल क्र. १/१६ प्रलंबित आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकरणाने दिनांक १०/०४/२०२३ रोजी वक्फ अपिल क्र.१/१६ च्या निशानी क्र. १ वर आदेशा पारीत करुन ॲडिशनल इश्यु (अतिरिक्त मुद्दे) काढलेले आहे. व वक्फ मंडळाला असे निर्देश दिले आहे की, सदर अतिरिक्त मुद्दे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबादकडे पाठवुन त्या मुद्याच्या संदर्भात खुलासेवार पुरावा घेऊन, घेतलेला पुरावा तसेच निकर्ष व त्या बाबतची कारणे नोंदवावे व ते महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकरणाकडे आठ आठवडयाच्या आत सादर करावे.

कलम ४० व नियम १८ विचारात घेता, मा. मंडळाच्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावयाची आहे. वक्फ प्राधिकरणाच्या वक्फ अपिल क्र. १/१६ मधील आदेशाचे पालन करण्याकरीता सविस्तर चौकशी करणे व चौकशी पुर्ण झाल्यानंतर चौकशी अहवाल महाराष्ट्र वक्फ मंडळासमोर सादर करणे आवश्यक आहे. सबब, कलम ४० व नियम १८ अंतर्गत सर्व प्रकरणांसाठी चौकशीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी, व चौकशी पुर्ण झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी अहवाल मंडळापुढे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर करावे. असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

एखादी मालमत्ता वक्फ आहे किंवा नाही हे ठरविण्याचे अधिकार वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ४० नुसार वक्फ मंडळास आहेत. सदर तरतुद खालीलप्रमाणे आहे :-

**40. Decision if a property is waqf property.—**

(1) **The Board may itself collect information** regarding any property which it has reason to believe to be waqf property and if any question arises whether a particular property is waqf property or not or whether a 1waqf is a Sunni waqf or a Shia waqf, it may, after making such inquiry as it may deem fit, decide the question.

(2) The decision of the Board on a question under sub-section 1 shall, unless revoked or modified by the Tribunal, be final.

(3) Where the Board has any reason to believe that any property of any trust or society registered in pursuance of the Indian Trusts Act, 1882 (2 of 1882) or under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or under any other Act, is waqf property, **the Board may notwithstanding anything contained in such Act, hold an inquiry in regard to such property** and if after such inquiry the Board is satisfied that such property is waqf property, call upon the trust or society, as the case may be, either to register such property under this Act as waqf property or show cause why such property should not be so registered:

कलम ४० अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबतची कार्यपद्धती वक्फ रुल्स, २०२२ मधील नियम क्र. १८ मध्ये विषद करण्यात आलेली आहे. नियम क्र. १८ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे :-

**18. Manner of enquiry under section 40 of the Act.-**

(1) The Chief Executive Officer shall collect the information for the purpose of sub-section (1) of section 40 of the Act in Form 11.

(2) The enquiry under sub-section (3) of section 40 of the Act by the Chief Executive Officer shall be as laid down in sub-rules (5) and (6) of rule 17.

(3) The Chief Executive Officer after obtaining orders from the Board shall,___

(a) Call upon the Trust or Society, as the case may be to register any property as Waqf property in Form 12;

(b) Issue a Show-cause Notice in Form 13;

(c) Proceed with the enquiry following the procedure as laid down in sub-rule (5) and (6) of rule 17;

**ठराव क्रमांक:-५** **वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ४० येथील तरतुदीनुसार व वक्फ रुल्स २०२२ मधील नियम १८ अंतर्गत सर्व प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट् राज्य वक्फ मंडळ यांची विशेष चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.**

# (चौकशी विभाग)

विषय क्रमांक:-**६** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(१) नुसार योजना मंजूरीसाठीच्या प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(१) नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या योजना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबींची पुर्तता करणारा प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे :-

| Sr No. | File No | District | Name Of Institution | Remark |
|---|---|---|---|---|
| १. | 69/414/2022 | Ahmednagar | Khadakpura Barudwale Masjid, Village Kharda Tq. Jamkhed Dist Ahmednagar | |
| २. | 69/236/2019 | Ahmednagar | Muslim Panch Committee (Jamat), Devlali Pravara Tq. Rahuri Dist Ahmednagar | |
| ३. | 69/598/2022 | Ahmednagar | Faizan E Madina Masjid Waqf at Ward No. 1, Millat Nagar, village Shrirampur Tq. Shrirampur Dist Ahmednagar | |
| ४. | 69/274/2022 | Beed | Madina Masjid at Somthana Tq. Majalgaon Dist Beed | |
| ५. | 69/323/2018 | Osmanabad | Graveyard, at Chinchpur Tq. Bhum Dist Osmanabad | |
| ६. | 69/479/2017 | Hingoli | Dargah Haz. Beena Saheb Near Railway Station, Hingoli Dist Hingoli | |
| ७. | 69/348/2021 | Solapur | Masjid Peer Ladle Waqf at Magalwedha Tq. Mangalwedha Dist Solapur | |

| Sr No. | File No | District | Name Of Institution | Remark |
|---|---|---|---|---|
| ८. | 69/151/2023 | Solapur | Masjid , at Pimpalner Tq. Madha Dist Solapur | |
| ९. | 69/115/2023 | Solapur | Jama Masjid (Masjid Muslim) at Khandali Tq. Malshiras Dist Solapur | |
| १०. | 69/05/2023 | Satara | Bakar Kasab Masjid, Mangalwar Peth Satara Tq. Dist Satara | |
| ११. | 69/801/2022 | Raigad | Anjuman Khidmatul Muslimin, 963/A-3, Karanja Road, Village uran Tq. Uran Dist Raigad | |
| १२. | 69/307/2016 | Raigad | Sunni Jama Masjid Madarsa Faizur Rasool Dargah Hazrath Peer Umar Shah Baba Rh and Sunni Muslim Qabrastan, at Kirawali Adiwali post Taloja, Panvel Dist Raigad | |
| १३. | 69/85/2023 | Raigad | Uppar Mohalla Masjid at Roha Tq. Roha Dist Raigad | |
| १४. | 69/547/2022 | Amravati | Masjid Raza, at Boriyapur Tq. Achalpur Dist Amravati | |
| १५. | 69/526/2022 | Amravati | Jumma Masjid , village Jarud, Tq. Morshi Dist Amravati | |
| १६. | 69/497/2019 | Akola | Abu Hurera Arbi Madarsa wo Masjid, at Raza nagar, village Akot Tq. AKot Dist Akola | |
| १७. | 69/971/2022 | Akola | Masjid wo Darul Uloom Mohammadiya village Mohala Tq. Akot Dist Akola | |
| १८. | 69/80/2019 | Akola | Hazrat Bilal Masjid, at Kuran Khed, Tq. Dist Akola | |
| १९. | 69/485/2019 | Akola | Dargah Hazrat Burhanuddin Auliya Masjid wo Kabrastan Intezamiya Committee, at Narnala TQ. Dist Akola | |
| २०. | 69/91/2023 | Buldhana | Masjid E Noorulhuda at village Malkapur Dist Buldhana | |
| २१. | 69/641/2022 | Buldhana | Masjid Noore Ali Raza , at Pimpalgaon Raja, Tq. Khamgaon Dist Buldhana | |
| २२. | 69/671/2022 | Pune | Anjuman-e-Saiful Islam Shaikshanik Sanstha, at Bhosri Tq. Haveli Dist Pune | |
| २३. | 69/213/2021 | Nashik | Hilal Madarsa at Malegaon Tq. Malegaon Dist Nashik | |
| २४. | 69/297/2020 | Nashik | Anjuman Raza E Ahle Sunnat Masjid o Madarsa, Plot No. 1, S. No. 210/A, village Pimpalgaon Bahura Tq. Nashik Dist Nashik | |
| २५. | 69/595/2022 | Nashik | Dargah Hazrat Pir Saheb, at Kolegaon Mal Tq. Sinner Dist Nashik | |
| २६. | 69/289/2020 | Jalgaon | Masjid Farhat gunj, at Marul Tq. Yawal Dist Jalgaon | |
| २७. | 69/447/2018 | Jalgaon | Noorani Masjid, Ghodgaon Tq. Chopda Dist Jalgaon | |
| २८. | 69/564/2021 | Jalgaon | Bhadangpura Masjid , Dharangaon Tq. Dharangaon Dist Jalgaon | |
| २९. | 69/591/2023 | Nagpur | Madarsa and Masjid Sayyed Jalaluddin (Meer Sukh) Rahematullah Alaih at Qasapura, Nagpur | |

वक्फ अधिनियम १९९५ उपरोक्त प्रकरणे या कार्यालयाने तपासली व प्रकरणात मा. कोर्टात कोणतेही वाद लवाद प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले नाही.

**ठराव क्रमांक:-६** **वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार उपरोक्त व्यवस्थापन योजनाच्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असून एकुण (२९) योजनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक:-७** वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या बदलाबाबत प्रस्तावांना मंजुरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छान्नी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणारा प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे :-

| Sr. No. | File No. | District | Name of Waqf Institution | Remarks |
|---|---|---|---|---|
| १. | 42/19/2022 | Amravati | Sayyed Saheb Dargah, Amravati Tq. Dist Amravati | |
| २. | 42/572/2021 | Amravati | Masjid Shipahipura, Wathoda, Bhatkuli Dist Amravati | |
| ३. | 42/257/2021 | Amravati | Jumma Masjid Sadar Bazar at Paratwada, Tq. Achalpur, Dist Amravati | |
| ४. | 42/73/2021 | Akola | Masjid Sansthan at Bordi Tq. Akot Dist Akola | |
| ५. | 42/206/2021 | Ahmednagar | Idgah and Masjid at Devlai Pravara, Tq. Rahuri Dist Ahmednagar | |
| ६. | 42/528/2023 | Pune | Pandhrichi Masjid at Rajgurunagar, Khed Tq. Khed Dist Pune | |
| ७. | 42/242/2021 | Nashik | Madni Center Wakf, at 10 khan House, Santa agar, New Agra Road, Nashik | |
| ८. | 42/720/2022 | Sangli | Jame Masjid , Miraj Tq. Miraj Dist Sangli | |
| ९. | 42/431/2023 | Pune | Masjid Ahmedabad , Shirur Tq. Shirur Dist Pune | |
| १०. | 42/615/2023 | Nagpur | Dargah and Qabarastan Baba Abdullah Shah Wali Trust, Kamptee, Nagpur | |
| ११. | 42/977/2022 | Nagpur | Jamiyat Islahul Muslimeen Charitable Society, Sadar Bazar, Nagpur | |
| १२. | 42/41/2021 | Raigad | [Taloja Mashid Taloja] Taloja Jama Masjid Trust, at Taloja Tq. Panvel Dist Raigad | |

**उपरोक्त प्रकरणे या कार्यालयाने तपासली उपरोक्त प्रकरणात मा. कोर्टात कोणतेही वाद लबाद प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले नाही.**

**ठराव क्रमांक:-७** **वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्राप्त झालेल्या उपरोक्त प्रस्तावाची तपासणी करण्यात आली असून एकुण (१२) प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.**

# (सियानत विभाग)

**विषय क्रमांक:-८**

**मस्जीद, आशुरखाना, मुसाफिरखाना दर्गाह मक्का शाह वली दिनी स्कुल व कब्रस्तान, गाडीपुरा, नांदेड च्या संबंधीत मौजे मौजे असर्जन येथील सर्वे नं. ५७ गट नं. १२० एकूण क्षेत्र २२ एकर १६ गुंठे (९.०६ हे.आर) जमीन अदलाबदल करणेकामी पुर्वी घेण्यात आलेले ठराव व आदेश रद्द करुन वक्फ जमीन वक्फ मंडळाच्या ताब्यात घेणेबाबत.**

मस्जीद, आशुरखाना, मुसाफिरखाना दर्गाह मक्का शाह वली दिनी स्कुल व कब्रस्तान, गाडीपुरा, नांदेड च्या संबंधीत मौजे मौजे असर्जन येथील सर्वे नं. ५७ गट नं. १२० एकूण क्षेत्र २२ एकर १६ गुंठे (९.०६ हे.आर) जमीनीच्या बदल्यात श्रेयस इन्फ्रास्ट्रक्चर चे भागीदार सपन सुशिलकुमार झुनझुनवाला वगैरे यांची खाली दर्शवलेली एकत्रित क्षेत्र २६.२२ हे.आर जमीन अदलाबदल करण्याची विनंती दर्गाहचे सज्जादा व मुतवल्ली अहमद हमीद खलील पिता मोहम्मद ताहेर यांनी प्रस्तावीत केली होती. सदर प्रस्ताव वक्फ मंडळाने बैठक दि.२६/८/२००५ मधील ठराव क्र. ३८, आणि बैठक दि.३०/११/२००५ मधील ठराव क्र. ११ तसेच बैठक दि.१९/६/२००६ अन्वये मान्यता दिल्यानंतर मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांचे दि.२१/६/२००६ च्या आदेशानुसार पत्र क्र. वक्फ/एसएनटी/३८३१/२००६ दि.२६/६/२००६ अन्वये खालील प्रमाणे जमीन अदलाबदल करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

**अदलाबदल केल्यानंतर दर्गाह हजरत मिरा मक्का शाह औलिया या संस्थेने धारण केलेली जमीन —**

| शिवार | तालुका | प्रकार | गट नंबर | लागवडी क्षेत्र हे.आर | पोट खराब क्षेत्र हे.आर | एकूण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | मुल्यांकन रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोरगांव | हदगांव | पाटस्थळ बागाईत | ८६ | १३.७० | ००.६० | १४.३० | ५६.५६ | ३८,८९,६००/- |
| पिंपरनवाडी | लोहा | हंगामी बागाईत | २६४/अ/१ | ३.२० | ०.०० | ३.२० | ५.०७ | ५,१२,०००/- |
| पिंपरनवाडी | लोहा | हंगामी बागाईत | २६५/१/अ | १.६२ | ०.०० | १.६२ | ३.६१ | २,५९,२००/- |
| कलंबर (बु) | लोहा | हंगामी बागाईत | ४३७ | २.६० | ०.०० | २.६० | ११.३२ | ४,७८,४००/- |
| कलंबर (बु) | लोहा | हंगामी बागाईत | ४३८ | २.६२ | ०.०० | २.६२ | ११.४८ | ४,८२,०८०/- |
| कलंबर (बु) | लोहा | हंगामी बागाईत | ४३९ | ०.१८ | ०.०० | ०.१८ | ०.७८ | ३३,१२०/- |
| कलंबर (बु) | लोहा | हंगामी बागाईत | ४४० | १.७० | ०.०० | १.७१ | ७.४१ | ३,१२,८००/- |
| | | | **एकूण** | **२५.६२** | **०.६०** | **२६.२२** | **९६.२२** | **५९,६७,०००/-** |

**अदलाबदल केल्यानंतर श्रेयस इन्फ्रास्ट्रकचरचे भागीदार सपन सुशिलकुमार झुनझुनवाला यांनी धारण केलेली जमीन**

| शिवार | तालुका | प्रकार | गट नंबर | लागवडी क्षेत्र हे.आर | पोट खराब क्षेत्र हे.आर | एकूण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | मुल्यांकन रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मौजे असरजन | नांदेड | जिराईत | १२० | ८.७१ | ०.३५ | ९.०६ | ३९.४२ | ५५,६६,०००/- |
| | | | **एकूण** | **८.७१** | **०.३५** | **९.०६** | **३९.४२** | **५५,६६,०००/-** |

महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. वक्फ१०/२००७/प्र.क्र.४७/ल-३ दि.१५/०३/२००७ अन्वये वक्फ मंडळास असे निदेश प्राप्त झाले की, **"तत्कालीन अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी नियमानुसार वक्फ मंडळाचा रितसर ठराव न घेता व मंडळाशी चर्चा मसलत न करता मंडळाच्या मान्यतेशिवाय वक्फ मालमत्ता हस्तांतरचे आदेश काढले आहे त्यामुळे असे व्यवहार नियमानुसार अवैध ठरत असल्याने ते रद्द ठरविण्यात येत आहे. अध्यक्ष वक्फ मंडळ यांनी काढलेल्या अनियमित आदेशाची अंमलबजावणी करु नये."**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची विशेष बैठक दि.१३/४/२००७ मध्ये ठराव क्र. १२ अन्वये असा निर्णय घेण्यात आला की, हस्तांतरणाचे अनियमित व्यवहार, ज्यामध्ये चर्चा मसलत न करता किंवा मंडळाच्या दोन तृतीयांश बहुमताने ठराव न घेता आदेश काढले आहे असे व्यवहार रद्द करण्यात आले आहेत. या धर्तीवर संबंधीत मालमत्ता वक्फ मंडळाकडे परत घेण्याची कार्यवाही कलम ५२ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी असे ठराव मंजुर करण्यात आले होते. त्यानुसार उपरोक्त जमीन ताब्यात घेण्यासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२ अन्वये नोटीस श्री.हमीदोद्दिन खलील पिता शाह मोहम्मद ताहेर मुतवल्ली तसेच श्रेयस इन्फ्रास्ट्रकचरचे भागीदार सपन सुशिलकुमार झुनझुनवाला यांना दि.२३/०४/२००७ अन्वये देण्यात आली होती व त्यानंतर दि.२३/४/२००७, ३/८/२००७, ३/८/२००७ अन्वये नोटीसेस देण्यात आलेली आहेत. परंतु श्रेयस इन्फ्रास्ट्रकचरचे भागीदार सपन सुशिलकुमार झुनझुनवाला यांनी सदर नोटीस विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.४२५८/२००७ दाखल केली होती.

अर्जदार अथर पाशा पिता नईम देशमुख रा.गाडीपुरा, नांदेड यांनी दि.३०/११/२०२१ व दि.१६/६/२०२३ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, दर्गाह मक्का शाह वली दिनी स्कुल व कब्रस्तान, गाडीपुरा, नांदेडचे सज्जादा आणि मुतवल्ली अहमद हमीदोद्दिन खलील हे वंशपरंपरागत मुतवल्ली नाही त्यांनी दर्गाहची ९.०६ हे.आर जमीन विकुन ग्रामीण भागातील जमीन घेतली आहे सदर जमीन खुप दुर आणि कमी दर्जाची आहे. श्री.अहमद हमीदोद्दिन खलील यांनी श्रेयस इन्फ्रास्ट्रकचर कडून २५ लाख रुपये घेतले असुन दर्गाहच्या जमीनीच्या बदल्यात घेतलेल्या जमीनीचा विकास केला नाही सदर रक्कम बँक खात्यात ठेवून पासबुकची प्रत वक्फ मंडळात जमा करण्याचे त्यांना आदेश होते परंतु मुतवल्लीने दर्गाहचे विकास आज पर्यंत केले नाही. सदरच्या बेकायदेशिर देवाण घेवाननंतर असर्जन येथील गट नं. १२० ची ४० आर जमीन विकास योजना नांदेड (सुधारीत) गोवर्धन घाट ब्रिज पासुन लातुर रोड पर्यंत (रोड क्र.१०) २४ मी. रुंद रस्त्यासाठी संपादीत जमीनीची निवाडा रक्कम

रु.३,६५,७०,०००/- न्यायालयात जमा केली असल्याचे नमुद केले आहे. तसेच गट नं.१२० पैकी २ हेक्टर ०१ आर (२०१०० चौ.मि) जमीन शासनाने सरकारी क्वॉटर बांधण्यासाठी संपादित केली केली असल्याचे नमुद केले आहे. वक्फ संस्थेची मालमत्ता बेकायदेशीर अदलाबदल देवाण घेवान बेकायदेशीर असून सदर व्यवहार रद्द करण्यासाठी श्री. अथर पाशा पिता नईन देशमुख यांनी वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे अर्ज क्र.४१/२०१५ तसेच मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.४२५८/०७ इंटरव्हिनर म्हणुन दाखल झाले आहे. सदर प्रकरणात श्रेयश इन्फ्रा स्ट्रक्चर यांनी संपादित जमीनीचा मोबदला मिळणेसाठी नांदेड वाघाळा महानगरपालिकेला निदेश मागविण्यासाठी मा.उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे प्रकरण दाखल केला आहे त्याला अर्जदाराने हरकत घेतली आहे.

श्रेयस इन्फ्रास्ट्रक्चर यांनी मा.सर्वोच्च न्यायालय, न्यू दिल्ली येथील विशेष रजा याचिका (सी) क्र.३०७५७/२०१७ मधील आदेश दि.१/९/२०२१ नुसार मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ, औरंगाबाद यांनी दि.९/१०/२०१७ रोजी दिलेल्या निकालात याचिकाकर्त्याने प्रथम नोटीसला प्रतिसाद देणे आणि त्यांनतर कायद्यानुसार त्यांच्या उपायांचा पाठपुरावा करणे असे आदेश देवून विशेष रजा याचिका फेटाळली आहे.

मा.उच्च न्यायालय, खंडपिठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ४८५५/२०१६ मध्ये रिट पिटीशन १२०७३/२०१६, रिट पिटीशन क्र.३२२८/२०२१ मध्ये दिवाणी अर्ज क्र.७०४२/२०२२ सह रिट पिटीशन क्र.३२२८/२०२१, रिट पिटीशन क्र. ३२२८/२०२१ मध्ये सीए/७२९१/२०२२ सह रिट पिटीशन क्र.३२२८/२०२१ सह सीऐ/७०४२/२०२२ सह रिट पिटीशन क्र.३२२८/२०२१ दाखल असुन भुसंपादन मोबदला वाटपा बाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

उपरोक्त प्रकरणात दुय्यम निबंधक नांदेड-१ यांच्याकडे दस्त क्र. डीड क्र.३४४१/०६ व ३४४२/२००६ दिनांक २८ जून २००६ रोजी नोंदणीकृत अदलाबदल खत झालेला आहे. सदर दस्त रद्द होने आवश्यक आहे. या संदर्भात वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ५१, ५२ मधील तरतुदीनुसार उपरोक्त मिळकत ताब्यात घेणे संबंधि नोटीस दि.१३/०५/२०२२ रोजी संबंधितांना देण्यात आलेली होती. प्रकरणात सुनावणी दि. १९/१०/२०२३ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

वर नमुद परिस्थीतीत अदलाबदल करार रद्द करुन भुसंपादन मोबदला व जमीन वक्फ मंडळाच्या ताब्यात घेण्यासाठी तत्कालीन वक्फ मंडळाने बैठक दि.२६/८/२००५ मधील ठराव क्र. ३८, बैठक दि.३०/११/२००५ मधील ठराव क्र. ११ तसेच तत्कालीन मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांचे दि.२१/६/२००६ व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दि.२६/६/२००६ चे आदेश रद्द करण्याचे वक्फ मंडळासमोर प्रस्तावीत आहे.

**ठराव क्रमांकः-८** **सदर प्रकरण पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांकः-९** **जामा मस्जीद डोलवी ता. पेन जि. रायगड च्या संबंधीत वक्फ मिळकत क्षेत्र ०.४४.७ हे.आर. व्यवसायिक वापरासाठी ३० वर्षासाठी भाडेपट्टा मंजूर करणे बाबत.**

**(तपासणी सुची)**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| | **अ) वक्फ संस्थेचा तपशील** | |

| | | |
|---|---|---|
| १ | वक्फ संस्थेचे नांव व नोंदणी क्रमांक | **जामा मस्जिद, डोलवी, ता. पेन, जि. रायगड नोंदणी क्र. MSBW/RGD/३५/२०१८** |
| | मालमत्ता परिशिष्ट-१ मध्ये/कलम ३७ नुसार रजिस्टर मध्ये आहे किंवा कसे | **आहे** |
| ३ | वक्फ संस्थेचे मुतवल्ली/व्यवस्थापकीय सदस्य नियुक्त करण्यात आलेल्या आदेशाचा दिनांक | **दि. १६/०९/२००९** |
| ४ | मालमत्ता भाडेतत्वावर देण्याबाबत संस्थेच्या ठरावाची प्रत जोडली आहे किंवा कसे | **नाही** |
| ५ | प्रस्ताव अधिकृत मुतवल्ली/व्यवस्थापकीय सदस्य यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आला आहे किंवा कसे | **आहे** |
| | **ब) मालमत्तेचा तपशील** | |
| ६ | भाडेतत्वावर द्यावयाच्य जागेचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | **क्षेत्र ०.४४.७ हे.आर** |
| ७ | रेडीरेकनर रेट (प्रति. चौ.मी.) | **४१७०/- प्रति चौ.मी.** |
| ८ | मालमत्तेची किमान राखीव किंमत | **३८,८३३/- प्रति माह** |
| | **क) जाहिर प्रकटनाचा तपशील** | |
| ९ | राष्ट्रीय वृत्तपत्राचे नांव व प्रगटनाचा दिनांक | **दैनिक इंडियन एक्सप्रेस इंग्रजी दिनांक ०७/०६/२०२३** |
| १० | विभागीय/स्थानिक वृत्तपत्राचे नांव व प्रगटनाचा दिनांक | **दैनिक रायगड वृत्तवेध मराठी दिनांक ०८/०६/२०२३** |
| ११ | जाहिर प्रगटनामध्ये खालील बाबींचा समावेश आहे किंवा कसे | **आहे** |
| | I) जागेचे एकूण क्षेत्रफळ व अचूक दिशानिर्देश | ०.४४.७ हे.आर |
| | II) ज्या कारणासाठी मालमत्ता भाडेपट्ट्याने द्यावयाची आहे त्याबाबतचा तपशील (व्यावसायिक/शैक्षणिक/धार्मिक/ कृषी विषयक कामे, इत्यादी) | **व्यावसायिक** |
| | III) प्रस्तावित भाडेकराराचा कालावधी (वर्षे) | **३० वर्ष** |
| | IV) किमान राखीव किंमत | **३८,८३३/- प्रति माह** |
| | **ड) लिलाव प्रक्रियेचा तपशील** | |
| १२ | लिलाव प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांची संख्या | **१) क्रिती लॉजिस्टीक्स ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रेक्टर, अली बाग, जि. रायगड**<br>**२) संदीप इंटरप्राईजेस इंजिनीअर ॲण्ड कॉन्ट्रेक्टर, अली बाग, जि. रायगड**<br>**३) जे.एस.डब्ल्यु, स्टील लि. डोलवी, ता. पेन, जि. रायगड** |

| | | |
|---|---|---|
| १३ | सर्वोच्च प्राप्त किंमत | **रु. ४३,०००/- प्रती माह** |
| १४ | सर्वोच्च किंमत देणाऱ्या निविदाधारकाचे नांव | **जे.एस.डब्ल्यु, स्टील लि. डोलवी, ता. पेन, जि. रायगड** |
| १५ | जुन्या भाडेकरूने निविदा प्रक्रियेत भाग घेतला आहे का | **निरंक** |
| १६ | असल्यास, सर्वोच्च बोली रकमेत मालमत्ता भाडेतत्वावर घेण्यास जुना भाडेकरू सहमत आहे का? | **निरंक** |

१. जामा मस्जीद डोलवी ता.पेण जि.रायगड ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अनुसार क्र.MSBW/RGD/३५/२००८ दि.११/०२/२००८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये सुचना क्र.मरावमं/चौकशी-१०८०/२५५२/२००९ दि.१६/६/२००९ प्रमाणे १)अब्दुल सत्तार अ.लतीफ खोत, २) अ.वहाब अ.लतीफ खोत, ३)अतिक महंमद अ.सत्तार खोत हे ३ वक्फ संस्थेचे कार्यरत विश्वस्त आहेत.

२. सदरील वक्फ संस्थेच्या संबंधित मिळकत सर्वे नं. १६१/१ पैकी क्षेत्र ०-४४-७ हे.आर जमीन महामार्गालगत असुन जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी या कंपनीच्या समोर आहे. या वक्फ जमीनीवर अनधिकृतपणे लोकांनी टीनशेड मध्ये दुकाने उभी करुन अतिक्रमणे केली होती. हे सर्व अतिक्रमण पुर्वीच्या कुळ कायदा अंतर्गत असलेले भाडेकरु यांनी केले होते सदर भाडेकरुचे निधन झाल्यानंतर त्याचे वारस म्हणुन लोकांनी कब्जा केला होता या विरुध तहसिलदार व इतर विभागात वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी दावा दाखल केला होता त्यामध्ये वक्फ संस्थेच्या बाजुने निर्णय झाला परंतु सदर वक्फ जमीनी वर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले होते. सदर अतिक्रमण हटविण्यासाठी तहसिल कार्यालयाकडून वक्फ मंडळास कोणतेही सहकार्य मिळाले नाही.

३. उपरोक्त प्रकरणात जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी यांनी त्यांच्या कंपनीच्या दर्शनी भागावर ही सर्व बेकायदेशिर अतिक्रमण व टिनशेड चांगले दिसत नव्हते.म्हणुन कंपनीने प्रस्ताव दिला की सदर जमीन त्यांना लिजवर दिल्यास त्या जागेचा वापर ग्रीनरीसाठी केला जाईल व चांगले पध्दतीने त्याची देखभाल करुन वक्फ संस्थेस सर्व सहकार्य केले जाईल अशी इच्छा त्यांनी व्यक्त करुन सदर जमीन वरील एकुण १२ ते १५ दुकाने व बांधलेले घराचे अतिक्रमण हटविले आहे. सदरची खुली जागा कंपनीसाठी उपयुक्त असल्याने त्यांनी सदर जमीन फक्त गार्डन व रस्त्याचे उपयोगासाठी दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयावर मिळणेस वक्फ संस्थेकडे विनंती केली होती. परंतु वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियमानुसार वक्फ मालमत्ता भाडेपट्टयावर देण्यासाठी दैनिक वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन इच्छुक लोकांकडून अर्ज मागविणे आवश्यक होते त्यासाठी वक्फ संस्थेने दैनिक रायगड वृत्तवेध, रायगड आणि दैनिक नवराष्ट्र, मुंबई या दैनिकात अनुक्रमे दि.३१/१०/२०२१ व दि.१०/११/२०२१ रोजी जाहिर प्रगटन प्रसिध्द करुन इच्छुक लोकांकडून अर्ज मागविले होते. त्यामध्ये बाजार मुल्यांकनाचे १ टक्के प्रमाणे दर महिन्यास मासिक भाडे रु.१५,५३३/- (रु.पंधरा हजार पाचशे तेतीस फक्त) वक्फ संस्थेतर्फे निश्चित करण्यात आले होते. निवीदा च्या शेवटच्या दिवसापर्यंत फक्त जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी यांचे अर्ज प्राप्त झाले व त्यांनी सदरील जागासाठी मासिक भाडे रु.२४,०००/- चे ऑफर दिले होते.

४. सदर प्रस्ताव वक्फ मंडळाची मान्यतेसाठी वक्फ मंडळाची बैठक दि.१७/०५/२०२२ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. वक्फ मंडळाने सदर प्रस्तावावर खालील प्रमाणे ठराव पारित केले आहे.

**(ठराव क्रमांक. ६)**

**वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार व्यवसायीक वापरासाठी भाडेकरार करण्यासाठी प्रतिवर्ष बाजार भावाच्या २.५% इतके किमान भाडे असणे आवश्यक आहे. भाडेकरार करावयाची जागा व्यवसायीक वापरासाठी वापरण्यात येणार आहे या बाबत स्पष्टता नाही सबब, या बाबत संबंधीत कंपनीसमवेत वाटाघाटी करण्यात यावा. सदर कंपनी प्रतिवर्ष बाजार भावाच्या किमान २.५% दराने भाडे देण्यास तयार असल्यास त्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात यावी. व या बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.**

उपरोक्त वक्फ मंडळाच्या ठरावानुसार प्रतीवर्ष बाजार भावाच्या २.५% दराने मासिक भाडे देण्यास तयार असल्यास त्याबाबत अनुकुलता दर्शविण्या बाबत या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-१५२/४०६०/२०२२ दि.२४/०५/२०२२ अन्वये मे.जे.एस.डब्ल्यू स्टील लि. डोवली, नोंदणीकृत कार्यालय बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा (पू) मुंबई-५१ यांना पत्राने कळविण्यात आले होते त्यांनी दि.३१/५/२०२२ व दि.१५/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सहमती दर्शवली असुन ३० वर्षासाठी लवकरात लवकर भाडेपट्टा करार करण्याची विनंती केली आहे. उपरोक्त वक्फ मिळकतीचे बाजार भावाच्या २.५% प्रमाणे मासिक भाडे रु.३८,८३३/- इतके होते.

५. सदर प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठक दिनांक १७/०५/२०२२ मधील ठराव क्र. ६ नुसार शासनाकडे पाठविले असता शासनाकडुन दि. २४/०२/२०२३ त्रुटी प्राप्त झाल्यामुळे त्याची पुर्तता करण्यासाठी दि. ०६/०४/२०२३ रोजी अध्यक्ष/ सचिव, जामा मस्जीद डोलवी, यांना कळविण्यात आले होते. त्यांनी दि. ०७/०८/२०२३ रोजी त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव सादर केले आहे.

६. वक्फ संस्थेने दैनिक इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी राष्ट्रीय वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. अ.क्र. २ नुसार सहाय्यक संचालक, नगर रचना, अलिबाग यांचे कार्यालयाकडील दिनांक २६/०७/२०२३ रोजीच्या झोन दाखवल्यानुसार सदर जागेवर कोणतेही आरक्षण नसल्याचे नमुद केले आहे. अ.क्र. ३ नुसार राष्ट्रीय वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने १) जे.एस.डब्ल्यु स्टील लि. डोलवी, २) क्रिती लॉजिस्टीक अलिबाग, ३) संदीप इंटरप्रायजेस या तीन कंपनीचे निविदा प्राप्त झाले आहे. तीन्ही निविदा धारकापैकी पात्र निविदा धारकाचे तपशील खालील प्रमाणे आहे.

| वक्फ संस्थेचे नांव | भाडेपट्टयाने दयावयाच्या जमीनीचा तपशिल | बाजार मुल्यांकन | वृत्तपत्रात प्रसिध्दी | निविदेत भाग घेणा-यांची संख्या | प्राप्त निविदा दर मासिक भाडे | पात्र निविदा धारकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| जामा मस्जीद डोलवी, ता. | सर्वे क्र. ६१/१ | प्रति चौ.मि. रु. **४१७०/-** व्यावसासिक | १. दैनिक इंडियन एक्सप्रेस इंग्रजी | ०३ | **१) ४३,०००/-**<br>२) ३०,०००/-<br>३) २४,०००/- | **जे.एस.डब्ल्यु, स्टील लि. डोलवी, पेन,** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पेन, जि. रायगड | | प्रयोजन २.५% प्रमाणे आरक्षित मासिक भाडे रु.३८,८३३/- | दि. ०७/०६/२०२३<br><br>२. दैनिक रायगड वृत्तवेध मराठी दि. ०८/०६/२०२३ | | +१८% GST | जि. रायगड |

७. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षा पर्यंतच्या भाडेकरारासाठी राज्य शासनाची पूर्व मंजुरी आवश्यक असल्याने प्रस्तुत प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविणे बाबत वक्फ मंडळाची मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे. सदर प्रस्ताव दिनांक ३०.०८.२०२३ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला असता सदर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्याचा ठराव मंडळाने पारित केला होता. सबब, प्रस्ताव मंडळाच्या फेरविचारार्थ सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक :-९** **प्रस्तावित भाडे हे बाजारभावापेक्षा खुप कमी असल्याचे दिसून येत असल्याने प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे. सदर मालमत्ता भाडेकरारावर देण्यासाठी पुनश्च वृत्तपत्र प्रसिद्धी करण्याबाबत वक्फ संस्थेस कळविण्यात यावे.**

## विषय क्रमांक १०:-

**कोकण मोहल्ला जुम्मा मस्जिद, ता. दापोली, जि. रत्नागिरी मस्जीदचे नुतनीकरण/नवीन बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.**

**वक्फ संस्थेचा नांव व पत्ता:-** **कोकण मोहल्ला जुम्मा मस्जिद, ता. दापोली, जि. रत्नागिरी**
**अर्जदाराचे नांव :-** **लियाकत युसुफ काझी, रा. दापोली, जि. रत्नागिरी**
**अर्ज दिनांक :-** **२०/०९/२०२२**

| अ.क्र. | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | अर्जाची पडताळणी करण्यात आलेली आहे? | होय. |
| २ | वक्फ संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत आहे? | MSBW/RTG/९१/२०१४ दिनांक ११/०९/२०१४ |
| ३ | अर्जदार वक्फ संस्थेचा ट्रस्टी/सदस्य आहे? | होय. |
| ४ | वक्फ मालमत्तेची नोंद महसुली अभिलेख ७/१२/नमुना नं.८/मालमत्ता पत्रक/म्यु घर नंबर इत्यादी मध्ये आहे? | सि.टी.एस.क्र. १७०७, १७०८ व १७०९ |
| ५ | वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना मंजुर आहे? | होय. |
| ६ | वक्फ संस्थेकडून ऑडिट/वक्फ फंड भरणा | होय. |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात आला आहे? | |
| ७ | वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी प्रस्तावित बांधकामासाठी ठराव घेतला आहे? | आहे. |
| ८ | अर्जदार यांनी प्रस्तावित बांधकाम जागाचे फोटो सादर केले आहे? | आहे. |
| ९ | प्रस्तावित बांधकाम क्षेत्रफळ? | ०.०८.३० हे.आर (G+३ मस्जीद इमारत) |
| १० | प्रस्तावित बांधकामाचे स्वरुप | मस्जिद नुतनीकरण/नवीन बांधकाम. |
| ११ | प्रस्तावित बांधकामाचा आराखडा आहे? | आहे. |
| १२ | प्रस्तावित बांधकामाचा अंदाजपत्रक खर्च | रु. **४,०२,२२,०८१/-(चार** कोटी दोन लक्ष बावीस हजार एक्कयांशी रुपये) |
| १३ | बांधकामासाठी कर्ज वगैरे घेण्यात आला आहे? | देगणीच्या स्वरुपात बांधकाम नुतणीकरण करणार असल्याबाबत वक्फ संस्थेचे सचिव यांनी प्रतिज्ञापत्र दिले आहे. |
| १४ | प्रस्तावित बांधकामासाठी सादर केलेले दस्ताऐवज खरे व बरोबर आहे याबाबत शपथपत्र दिले आहे? | आहे. |
| १५ | अर्जदाराने नाहरकत प्रमाणपत्राची प्रोसेस फी भरणा केली आहे? | पावती क्र. ५८४९८ दिनांक २०/०९/२०२२ |

उपरोक्त प्रकरणात अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांचे पत्र क्र.वक्फ/रत्नागिरी/एसएनटी-१/१२८/२०२३ दि.२७/०७/२०२३ अन्वये अहवाल सादर केले आहे. सदरील संस्थेची गट क्र. ५ चे क्षेत्र ०.०८.३० आर.चौ.मी. ही नोंदणीकृत वक्फ मिळकत आहे. सदर मिळकत गावठाणात असल्याने सि.टी.एस. क्र. १७०७ क्षेत्र ३३.७० चौ.मी., सि.टी.एस.क्र. १७०८ क्षेत्र १९५.८० चौ.मी., सि.टी.एस. क्र. १७०९ क्षेत्र ७२७.७० चौ.मी. असे नवीन मिळकत क्रमांक देण्यात आलेले आहेत. सदर जागेवर १०० वर्षापासुन मस्जिद अस्तित्तवात आहे. त्यामुळे पाऊसाळयात पावसाच्या पाण्यामुळे मस्जिदमध्ये गळती होत आहे. अशा कारणांमुळे जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणुन जुनी मस्जिदचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. बांधकामाचे नकाशानुसार सदरील मस्जिदच्या तिसऱ्या मजल्यावर मस्जिदचे इमाम व मुअज्जन यांना राहणेकरिता रुम बनविण्यात येणार आहे. तसेच त्याव्यतिरिक्त कोणतेही व्यावसायिक गाळे वगैरे बांधण्यात येणार नाही.

सदरील मस्जिद शहीद करुन नवीन बांधकाम करणेसाठी एकुण रु. ४,०२,२२,०८१/- (अक्षरी चार कोटी दोन लक्ष बावीस हजार एक्कयांशी रुपये फक्त) खर्चाचे अंदाजपत्रक आहे. सदरील

रक्कम देगणीच्या स्वरुपात स्विकारुन बांधकाम करण्यात येणार आहे. उपरोक्त प्रकरणांत प्र. जिल्हा वक्फ अधिकारी, रत्नागिरी यांनी मस्जिद नुतनीकरण करण्याची शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ (१) (क) मधील तरतुदीनुसार वक्फचा संभाळ करण्यासाठी (जतन करण्यासाठी) देखभाल करण्यासाठी सर्वसाधारणपणे आवश्यक असतील ती सर्व कामे करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ६८ व्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ४२ (अ) नुसार मस्जीद दर्गाह, कब्रस्तान, ईदगाह, आशुरखाना व इतर वक्फ संस्थांच्या दुरुस्ती/नुतनीकरण, संरक्षण भिंती, पेव्हर ब्लॉक, इदगाह वट्टा, जनाजा नमाज पठणसाठी शेड तसेच मोडकळीस आलेल्या वक्फाच्या अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रु.२५ लाख पर्यंतच्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात आले आहे.

उपरोक्त मस्जीदचे बांधकाम २५ लाख पेक्षा जास्त रकमेचे आहे. सदर कामासाठी वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ मधील तरतुदीनुसार नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांकः-१०** **कोकण मोहल्ला जुम्मा मस्जिद, ता. दापोली, जि. रत्नागिरी या मस्जीदच्या प्रस्तावित नुतनीकरण/नवीन बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी मंडळची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

## विषय क्रमांकः-११

**हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिणोध्दार ट्रस्ट कमेटी, औंध, ता. हवेली, जि. पुणे येथे दर्गाहचे विकास, कॉंक्रिटीकरण व ड्रेनेजलाईनसाठी नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

वक्फ संस्थेचा नांव व पत्ता : हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिणोध्दार ट्रस्ट कमेटी, जुना सर्वे क्र. १५२/६, नविन सर्वे क्र. २४, बॉडीगेट पोलीस लाईन, औंध, ता. हवेली, जि. पुणे.

अर्जदाराचे नांव : श्रावणकुमार लालसिंग राजपुर, रा. बी-१, कोरेगांव पार्क, पुणे.

अर्ज दिनांक : ०५/१०/२०२३

| अ.क्र | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | अर्जाची पडताळणी करण्यात आलेली आहे? | होय. |
| २ | वक्फ संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत आहे? | MSBW/PUN/५४४/२०१९ दिनांक ०६/०३/२०१९ |
| ३ | अर्जदार वक्फ संस्थेचा ट्रस्टी/सदस्य आहे? | होय. |
| ४ | वक्फ मालमत्तेची नोंद महसुली अभिलेख ७/१२/नमुना नं.८/मालमत्ता पत्रक/म्यु घर नंबर इत्यादी मध्ये आहे? | जुना सर्वे क्र. १५२/६, नविन सर्वे क्र. २४ न.भु.क्र. ९९५ व ९९६. |
| ५ | वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना मंजुर आहे? | फेरफार अर्ज प्रलंबित आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६ | वक्फ संस्थेकडून ऑडिट/वक्फ फंड भरणा करण्यात आला आहे? | आहे. |
| ७ | वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी प्रस्तावित बांधकामासाठी ठराव घेतला आहे? | आहे. |
| ८ | अर्जदार यांनी प्रस्तावित बांधकाम जागाचे फोटो सादर केले आहे? | आहे. |
| ९ | प्रस्तावित बांधकाम क्षेत्रफळ? | १० गुंठे |
| १० | प्रस्तावित बांधकामाचे स्वरुप | दर्गाहचे विकास, कॉंक्रिटीकरण व ड्रेनेज लाईनचे काम |
| ११ | प्रस्तावित बांधकामाचा आराखडा आहे? | आहे. |
| १२ | प्रस्तावित बांधकामाचा अंदाजपत्रक खर्च | रु. **३५,००,०००/-(पस्तीस** लक्ष फक्त) |
| १३ | बांधकामासाठी कर्ज वगैरे घेण्यात आला आहे? | नाही. सदर बांधकाम महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय नाक्षेवि-२०२२/प्र.क्र.१४४/का.९ दि. २४/०१/२०२३ नुसार क्षेत्रविकास कार्यक्रमसाठी मंजुर अनुदानातुन करण्यात येणार आहे. |
| १४ | प्रस्तावित बांधकामासाठी सादर केलेले दस्ताऐवज खरे व बरोबर आहे याबाबत शपथपत्र दिले आहे? | आहे. |
| १५ | अर्जदाराने नाहरकत प्रमाणपत्राची प्रोसेस फी भरणा केली आहे? | पावती क्र. ६०००० दिनांक ०४/१०/२०२३ |

उपरोक्त प्रकरणात अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे यांचे पत्र जा.क्र.जिवअ/सियानत/५७३/२०२३ दिनांक १२/१०/२०२३ अन्वये अहवाल सादर केले आहे. वक्फ संस्था हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिणोध्दार ट्रस्ट कमेटी, जुना सर्वे क्र. १५२/६, नविन सर्वे क्र. २४, बॉडीगेट पोलीस लाईन, औंध, ता. हवेली, जि. पुणे वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन त्याचा नोंदणी क्र. MSBW/PUN/५४४/२०१९ असा आहे.

सदरील वक्फ संस्था सर्वे नं. १५२/६ मौजे औध, ता. हवेली, जि. पुणे मध्ये असुन या वक्फ संस्थेच्या मिळकत क्षेत्र १० गुंठे पैकी ३ गुंठे जमीनीवर महानगर पालिका, पुणे यांनी अतिक्रमण केलेले असुन उर्वरित ७ गुंठे क्षेत्रात सदर वक्फ संस्था अस्तित्वात आहे. तसेच वक्फ संस्था व्यवस्थापनबाबत वक्फ मंडळात फेरफार अर्ज प्रलंबित असुन सदर वक्फ संस्थेचे व्यवस्थापन अर्जदार श्रावणकुमार लालसिंग राजपुर, रा. बी-१, कोरेगांव पार्क, करीत आहे.

प्रकरणात महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभाग शासन निर्णय नाक्षेवि-२०२२/प्र.क्र.१४४/का.९ दि. २४/०१/२०२३ नुसार क्षेत्रविकास राज्यातील अल्पसंख्याक बहुल नागरी

क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी **हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिणोध्दार ट्रस्ट कमेटी, औंध** या संस्थेस ३५ लक्ष रुपये मंजुर असुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | मंजुर रक्कम |
|---|---|---|
| १ | **हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिणोध्दार ट्रस्ट कमेटी येथे काँक्रीटीकरण करण्यासाठी** | १०.०० लक्ष |
| २ | **हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिणोध्दार ट्रस्ट कमेटी येथे विविध विकास कामे करणेसाठी** | १०.०० लक्ष |
| ३ | **हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिणोध्दार ट्रस्ट कमेटी येथे दुरूस्ती विषयक कामे करणेसाठी** | १०.०० लक्ष |
| ४ | **हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिणोध्दार ट्रस्ट कमेटी येथे ड्रेनेज विषयक कामे करणेसाठी** | ५.०० लक्षे |

सदरील दर्गाहच्या विविध विकास कामे शासनाच्या निधीतुन होत असल्याने नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत जिल्हा वक्फ अधिकारी, पुणे यांनी शिफारस करुन अहवाल सादर केले आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ६८ व्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ४२ (अ) नुसार मस्जीद दर्गाह, कब्रस्तान, ईदगाह, आशुरखाना व इतर वक्फ संस्थांच्या दुरुस्ती/नुतनीकरण, संरक्षण भिंती, पेव्हर ब्लॉक, इदगाह वट्टा, जनाजा नमाज पठणसाठी शेड तसेच मोडकळीस आलेल्या वक्फाच्या अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रु.२५ लाख पर्यंतच्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात आले आहे.

उपरोक्त पुर्नविकास काम २५ लाख पेक्षा जास्त रकमेचा आहे. सदर कामासाठी वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ मधील तरतुदीनुसार नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मंजुरीसाठी ठेवणे बाबत आदेशास्तव सादर

**ठराव क्रमांक:-११** **हजरत सय्यद लाल शाह वली दर्गाह जिर्णोध्दार ट्रस्ट कमेटी, औंध, ता. हवेली, जि. पुणे या वक्फ संस्थेच्या प्रस्तावित कामांसाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी मंडळची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर विकास कामांमुळे वक्फ मालमत्तेच्या मालकी हक्कात कोणताही बदल होणार नाही हे आदेशात नमूद करण्यात यावे.**

## विषय क्रमांक:-१२

**मोहम्मदी जुम्मा सुन्नी मस्जिद ॲण्ड ग्रेव्हयार्ड, मौजे कोकणगाव, ता. निफाड, जि. नाशिक वक्फ संस्थेच्या मिळकती मध्ये शादीखाना बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

वक्फ संस्थेचा नांव व पत्ता : मोहम्मदी जुम्मा सुन्नी मस्जिद ॲण्ड ग्रेव्हयार्ड, मौजे कोकणगाव, ता. निफाड, जि. नाशिक.

अर्जदाराचे नांव : सय्यद रफिक मोहम्मद, रा. कोकणगा, ता. निफाड, जि. नाशिक

अर्ज दिनांक : २२/०५/२०२३

| अ.क्र | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | अर्जाची पडताळणी करण्यात आलेली आहे? | होय. |
| २ | वक्फ संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत आहे? | MSBW/२७/२००६<br>दिनांक १७/०३/२००६ |
| ३ | अर्जदार वक्फ संस्थेचा ट्रस्टी/सदस्य आहे? | होय. |
| ४ | वक्फ मालमत्तेची नोंद महसुली अभिलेख ७/१२/नमुना नं.८/मालमत्ता पत्रक/म्यु घर नंबर इत्यादी मध्ये आहे? | गट क्र. ५०५ |
| ५ | वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना मंजुर आहे? | आहे. |
| ६ | वक्फ संस्थेकडून ऑडिट/वक्फ फंड भरणा करण्यात आला आहे? | आहे. |
| ७ | वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी प्रस्तावित बांधकामासाठी ठराव घेतला आहे? | आहे. |
| ८ | अर्जदार यांनी प्रस्तावित बांधकाम जागाचे फोटो सादर केले आहे? | आहे. |
| ९ | प्रस्तावित बांधकाम क्षेत्रफळ? | २६ आर. |
| १० | प्रस्तावित बांधकामाचे स्वरुप | शादीखाना बांधकाम. |
| ११ | प्रस्तावित बांधकामाचा आराखडा आहे? | आहे. |
| १२ | प्रस्तावित बांधकामाचा अंदाजपत्रक खर्च | रु. **१०,००,०००/-(दहा** लक्ष फक्त) |
| १३ | बांधकामासाठी कर्ज वगैरे घेण्यात आला आहे? | नाही. |
| १४ | प्रस्तावित बांधकामासाठी सादर केलेले दस्ताऐवज खरे व बरोबर आहे याबाबत शपथपत्र दिले आहे? | आहे. |
| १५ | अर्जदाराने नाहरकत प्रमाणपत्राची प्रोसेस फी भरणा केली आहे? | पावती क्र. ६९९८० दिनांक<br>२२/०५/२०२३ |

उपरोक्त प्रकरणात अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, नाशिक यांचे पत्र जा.क्र.जिवअ/एसएनटी/३३९/२०२३ दिनांक २१/०७/२०२३ अन्वये अहवाल सादर केले आहे. वक्फ संस्था **मोहम्मदी जुम्मा सुन्नी मस्जिद ॲण्ड ग्रेव्हयार्ड, गट क्र. ५०५, मौजे कोकणगाव, ता.निफाड, जि. नाशिक** ही वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन त्याचा नोंदणी क्र. MSBW/२७/२००६ असा आहे. सदरील वक्फ संस्थेची दैनंदिन प्रशासनासाठी योजना मंजुर असुन अर्जदार रफीक मोहम्मद सय्यद व सदर वक्फ संस्थेचे अध्यक्ष आहे.

सदरील वक्फ संस्थेंची नोंद ७/१२ च्या मालकी रकान्यात मौजे कोकणगाव, ता. निफाड जि. नाशिकचे गट क्र. ५०५ मध्ये असुन क्षेत्र ०.२६ आर इतकी आहे तसेच ग्राम पंचायत कोकणगाव यांच्याकडील अभिलेख गाव नमुना नं. ८ मध्ये मिळकत क्र. १०८८ वर नोंद असुन एकुण क्षेत्र ०.२६ आर आहे. सदर वक्फ संस्थेमध्ये नियमितपणे ५ वेळा नमाज अदा होत असुन उत्पन्न नसल्यामुळे दैनंदिन गरजा चंदा वर्गणी करुन होते.

महाराष्ट्र शासनाकडुन अल्पसंख्याक बहुल ग्रामीण भागात मुलभुत व पायाभुत सुविधा सन २०१६-१७ अंतर्गत रुपये १० लक्ष निधी शादीखाना हॉलसाठी मंजुर करण्यात आले होते त्यानुसार सदर संस्थेस या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-७५०/०७/१६/२०१६ दिनांक १५/१२/२०१६ अन्वये शादीखाना हॉल बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर शादीखाना बांधकाम २६ आर जमीनीपैकी १३ गुंठे जमीन कब्रस्तान व उर्वरीत जागा मध्ये मस्जीद व खुली जागा असुन खुली जागा मध्ये शादीखाना बांधकाम करण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

वक्फ संस्थेचे विश्वस्त यांनी विनंती केली आहे की, मुस्लिम लोकांना शादीखाना नसल्यामुळे वक्फ मिळकतीत शादीखाना बांधकामासाठी सर्वानुमते ठराव मंजुर केला आहे. सदरील शादीखाना करिता १० लक्ष रुपये ग्रामविकास अधिकारी कार्यालय कोकणगाव यांचेकडे जमा आहे. उपरोक्त वक्फ संस्थेचे १० लक्ष रुपयेचे शादीखाना बांधकाम बाकी असल्याने अर्जदार यांनी दिनांक २२/०५/२०२३ रोजी अर्ज देवुन नाहरकत दाखला मिळणेस विनंती केली आहे.

प्रकरणांत सदरील वक्फ संस्थेकरिता मौजे कोकणगाव, ता. निफाड, जि. नाशिक येथे गट नं. ५०५ क्षेत्र ०.२६ पैकी खुली जागा मध्ये शादीखाना बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत जिल्हा वक्फ अधिकारी, नाशिक यांनी शिफारस करुन अहवाल सादर केले आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ६८ व्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ४२ (अ) नुसार मस्जीद, दर्गाह, कब्रस्तान, ईदगाह, आशुरखाना व इतर वक्फ संस्थांच्या दुरुस्ती/नुतनीकरण, संरक्षण भिंती, पेव्हर ब्लॉक, इदगाह वट्टा, जनाजा नमाज पठणसाठी शेड तसेच मोडकळीस आलेल्या वक्फाच्या अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रु.२५ लाख पर्यंतच्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात आले आहे.

उपरोक्त वक्फ मिळकती मध्ये शादीखाना बांधण्यासाठी वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ मधील तरतुदीनुसार नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे

**ठराव क्रमांक:-१२** **मोहम्मदी जुम्मा सुन्नी मस्जिद ॲण्ड ग्रेव्हयार्ड, मौजे कोकणगाव, ता. निफाड, जि. नाशिक वक्फ संस्थेच्या मिळकती मध्ये प्रस्तावित शादीखाना बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यास वक्फ मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक:-१३**

**जामे मस्जिद, छिल्ला महेबुब सुब्हानी, ईदगाह, ता. देवणी, जि. लातुर येथील मस्जीदचे नुतनीकरण बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

| | |
|---|---|
| वक्फ संस्थेचा नांव व पत्ता : | जामे मस्जिद,छिल्ला महेबुब सुब्हानी, ईदगाह, (खुली जागा गावठाण), ता.देवणी, जि. लातुर. |
| अर्जदाराचे नांव : | अमजत बिस्मिल्लाह बालकुंदे, रा. गुरनाळ, ता. देवणी, जि. लातुर |

अर्ज दिनांक : ०१/०३/२०२३

| अ. क्र. | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | अर्जाची पडताळणी करण्यात आलेली आहे? | होय. |
| २ | वक्फ संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत आहे? | MSBW/LTR/१६१/२०१२ दिनांक २३/१०/२०१२ |
| ३ | अर्जदार वक्फ संस्थेचा ट्रस्टी/सदस्य आहे? | होय. |
| ४ | वक्फ मालमत्तेची नोंद महसुली अभिलेख ७/१२/नमुना नं.८/मालमत्ता पत्रक/म्यु घर नंबर इत्यादी मध्ये आहे? | नमुना नं. ८, मालमत्ता क्र. ४०९ |
| ५ | वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना मंजुर आहे? | योजना प्रलंबित. |
| ६ | वक्फ संस्थेकडून ऑडिट/वक्फ फंड भरणा करण्यात आला आहे? | आहे. |
| ७ | वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी प्रस्तावित बांधकामासाठी ठराव घेतला आहे? | आहे. |
| ८ | अर्जदार यांनी प्रस्तावित बांधकाम जागाचे फोटो सादर केले आहे? | आहे. |
| ९ | प्रस्तावित बांधकाम क्षेत्रफळ? | ३१२७ चौ.फुट |
| १० | प्रस्तावित बांधकामाचे स्वरुप | मस्जिद नवीन बांधकाम |
| ११ | प्रस्तावित बांधकामाचा आराखडा आहे? | आहे. |
| १२ | प्रस्तावित बांधकामाचा अंदाजपत्रक खर्च | रु. **५९,१५,०००/-** (**एकोणसाठ** लक्ष पंधरा हजार रुपये) |
| १३ | बांधकामासाठी कर्ज वगैरे घेण्यात आला आहे? | स्थानिक मुस्लिम लोकांच्या चंदा वर्गणीतुन बांधकाम करणार असल्याचे वक्फ संस्थेचे अध्यक्ष यांनी अर्जात नमुद केले आहे. |
| १४ | प्रस्तावित बांधकामासाठी सादर केलेले दस्ताऐवज खरे व बरोबर आहे याबाबत शपथपत्र दिले आहे? | आहे. |
| १५ | अर्जदाराने नाहरकत प्रमाणपत्राची प्रोसेस फी भरणा केली आहे? | पावती क्र. ६७३८९ दिनांक ०१/०३/२०२३ |

उपरोक्त प्रकरणात अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली आहे. तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, लातुर यांनी पत्र जा.क्र. वक्फ/सियानत/१९१/२०२३ दि. २१/०५/२०२३ अन्वये अहवाल सादर केले आहे. सदरील वक्फ संस्थेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ०१/०५/१९८० अनु.क्र. ९१, भाग-अ च्या पान क्र. ८२ व ८३ वर असुन राजपत्रानुसार सदर वक्फ संस्थेचे एकुण क्षेत्र १४१७५ चौरस फुट क्षेत्र आहे. सदर मस्जिद क्षेत्र ५०० चौरस फुट मध्ये अस्तित्वात असुन सदर

मस्जिद बांधकाम अत्यंत जुने व जिर्ण झालेले असल्याने कोणताही भाग कोसळुन जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच मस्जिदचे क्षेत्र कमी असल्याने नमाज अदा करण्यासाठी जागा अपुरी पडत असल्याने मस्जिदचे नवीन बांधकाम करणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी जोडलेल्या बांधकाम नकाशानुसार सदर मस्जिदचे बांधकामाचे क्षेत्र ३१२७ चौ.फुट आहे.

सदरील मस्जिद चे नवीन बांधकाम करणेसाठी एकुण रु.५९,१५,०००/- (अक्षरी एकुणसाठ लक्ष पंधरा हजार रुपये फक्त) खर्चाचे अंदाजपत्रक आहे. सदरील रक्कम स्थानिक मुस्लिम लोकांच्या चंदा वर्गणीतुन बांधकाम करणार असल्याचे वक्फ संस्थेचे अध्यक्ष यांनी अर्जात नमुद केले आहे. उपरोक्त प्रकरणांत जिल्हा वक्फ अधिकारी, लातुर यांना मस्जिद बांधकामासाठी परवानगी देण्याची शिफारस केली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ६८ व्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ४२ (अ) नुसार मस्जीद, दर्गाह, कब्रस्तान, ईदगाह, आशुरखाना व इतर वक्फ संस्थांच्या दुरुस्ती/नुतनीकरण, संरक्षण भिंती, पेव्हर ब्लॉक, इदगाह वट्टा, जनाजा नमाज पठणसाठी शेड तसेच मोडकळीस आलेल्या वक्फाच्या अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रु.२५ लाख पर्यंतच्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात आले आहे.

उपरोक्त मस्जीदचे बांधकाम २५ लाख पेक्षा जास्त रकमेचा आहे. सदर कामासाठी वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ मधील तरतुदीनुसार नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मंजुरीसाठी ठेवणे बाबत आदेशास्तव सादर.

**ठराव क्रमांकः- १३** **जामे मस्जिद, छिल्ला महेबुब सुब्हानी, ईदगाह, ता. देवणी, जि. लातुर येथील मस्जीदच्या प्रस्तावित नुतनीकरण बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्यास वक्फ मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांकः-१४** **मस्जिद अखतरी बशीरगंज, बीड च्या संबंधित दुकान क्षेत्र ८०० चौ.फुट जागा ३ वर्षे कालावधीसाठी भाडेपट्टा मंजुर करणे बाबत.**

**तपासणीसूची**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| **अ) वक्फ संस्थेचा तपशील** | | |
| १ | वक्फ संस्थेचे नांव व नोंदणी क्रमांक | **मस्जिद अखतरी बशीरगंज, बीड नोंदणी क्र. MSBW/BED/१२६/२००७** |
| २ | मालमत्ता परिशिष्ट-१ मध्ये/कलम ३७ नुसार रजिस्टर मध्ये आहे किंवा कसे | **आहे** |
| ३ | वक्फ संस्थेचे मुतवल्ली/व्यवस्थापकीय सदस्य नियुक्त करण्यात आलेल्या आदेशाचा दिनांक | **वक्फ मंडळाच्या नियंत्रणात आहे** |

| | | |
|---|---|---|
| ४ | मालमत्ता भाडेतत्वावर देण्याबाबत संस्थेच्या ठरावाची प्रत जोडली आहे किंवा कसे | **वक्फ मंडळाच्या नियंत्रणात आहे** |
| ५ | प्रस्ताव अधिकृत मुतवल्ली/व्यवस्थापकीय सदस्य यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आला आहे किंवा कसे | **वक्फ मंडळाच्या नियंत्रणात आहे** |
| **ब) मालमत्तेचा तपशील** | | |
| ६ | भाडेतत्वावर द्यावयाच्य जागेचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | **८०० चौरस फुट (७४.३२ चौ.मी)** |
| ७ | रेडीरेकनर रेट (प्रति. चौ.मी.) | **रू. ४०,०००/-** |
| ८ | मालमत्तेची किमान राखीव किंमत | **६,१९५/- प्रति महिना** |
| **क) जाहिर प्रकटनाचा तपशील** | | |
| ९ | राष्ट्रीय वृत्तपत्राचे नांव व प्रगटनाचा दिनांक | **दैनिक भास्कर दिनांक २२/०८/२०२३** |
| १० | विभागीय/स्थानिक वृत्तपत्राचे नांव व प्रगटनाचा दिनांक | **सुराज्य वृत्तपत्र दिनांक २४/०८/२०२३** |
| ११ | जाहिर प्रगटनामध्ये खालील बाबींचा समावेश आहे किंवा कसे | **आहे** |
| | i) जागेचे एकूण क्षेत्रफळ व अचूक दिशानिर्देश | **८०६४ चौरस फुट (७४९.१७ चौ.मी)**<br>**पुर्व:** गट नं. खुली जागा<br>**पश्चिम:** खुली जागा<br>**उत्तर:** गल्ली आणि सय्यद अली व इतर यांचे घर<br>**दक्षिण:** खुली जागा |
| | ii) ज्या कारणासाठी मालमत्ता भाडेपट्टयाने द्यावयाची आहे त्याबाबतचा तपशील (व्यावसायिक/शैक्षणिक/धार्मिक/ कृषी विषयक कामे, इत्यादी) | **व्यवसायिक** |
| | iii) प्रस्तावित भाडेकराराचा कालावधी (वर्षे) | **३ वर्षे** |
| | iv) किमान राखीव किंमत | **६,१९५/- प्रति महिना** |
| **ड) लिलाव प्रक्रियेचा तपशील** | | |
| १२ | लिलाव प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांची संख्या | १) शेख सलमान पि. शेख सईद<br>**२) काजी समिरोद्दीन पि. रईसोद्दीन**<br>३) पठाण महेबुब खान हमीद खान<br>४) राजेंद्र बाबुराव होळकर |
| १३ | सर्वोच्च प्राप्त किंमत | **रु. ७२००/- प्रति महिना** |
| १४ | सर्वोच्च किंमत देणाऱ्या निविदाधारकाचे नांव | **काजी समिरोद्दीन पिता रईसोद्दीन** |
| १५ | जुन्या भाडेकरूने निविदा प्रक्रियेत भाग घेतला आहे का | **नाही** |
| १६ | असल्यास, सर्वोच्च बोली रकमेत मालमत्ता | **निरंक** |

| | | |
|---|---|---|
| | भाडेतत्वावर घेण्यास जुना भाडेकरू सहमत आहे का | |

जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी पत्र जा.क्र./जिवअ/एसएनटी विभाग-१२/१९३/२०२३ दिनांक १२/०९/२०२३ अन्वये अहवाल सादर केला आहे की, मस्जिद अखतरी, बशीरगंज, बीडची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २४/०१/१९७४ च्या अनुक्रमांक ४०, भाग-क च्या पृष्ठ क्र. ६० व ६१ वर असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र. MSBW/BED/१२६/२००७ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदर संस्था वक्फ मंडळाच्या थेट नियंत्रणात आहे.

सदरील वक्फ संस्थेची मिळकतीमध्ये मराठवाडा वक्फ बोर्डतर्फे श्री. मोहम्मद ताहेर पिता अब्दुल गणी यांना २० X ४० (८०० चौरस फुट) जागा सन १९८५ मध्ये भाडेतत्वार देण्यात आली होती. भाडेकरु यांनी सदरील जागा (हॉटेल) चे भाडे डिसेंबर २०२२ पर्यत भरणा केलेले आहे. बोर्डाचे भाडेकरु मोहम्मद ताहेर पिता अब्दुल गणी यांनी सदर दुकान पठाण महेबुब खान हमीद खान यांना पोट भाडेकरु ठेवल्याने दोघांमध्ये वाद झालेला होता. न्यायालयाने भाडेकरु मोहम्मद ताहेर अब्दुल गणी यांच्या बाजुने निकाल दिला. सदरील हॉटेलला मस्जिदचे अध्यक्ष व जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी कुलुप लावले होते परंतु शेख ताहेर बागवान व त्याचा मुलगा यांनी कुलुप तोडुन दुकानाला कुलुप लावले सध्या हॉटेल बंद आहे.

वक्फ संस्थेची एकुण मिळकत क्षेत्र ८०६४ चौ.फुट पैकी ८०० चौ.फुट जागा वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार भाडेतत्वावर देण्याकरीता सन २०२३ चे ऑनलाईन बाजार मुल्यांकन प्रमाणे प्रति चौरस मिटरचे दर रु.४०,०००/- आहे त्याप्रमाणे उपरोक्त जागाचे व्यवसायिक वापरासाठी २.५% दराने मासिक भाडे रु.६१९५/- आरक्षित करुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ आणि वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मधील नियम ३, नुसार इच्छुक लोकांकडून साध्या कागदावर बंद पाकीटात बोलीसाठी अर्ज मागविण्यात आले व त्यासाठी जाहिर नोटीस दि.२२/०८/२०२३ रोजी वक्फ संस्थेच्या नोटीस बोर्डवर व जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, बीड येथील नोटीस बोर्डवर लावण्यात आली होती. सदर लिलाव/बोली दि. ०१/०९/२०२३ रोजी ठेवण्यात आली.

सदर लिलाव/बोली मध्ये ४ लोकांनी अनामत रक्कम रु.१०,०००/- जिल्हा वक्फ कार्यालयात जमा करुन बोली लावली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | दर महिना/मासिक भाडे/बोली |
|---|---|---|
| १ | शेख सलमान पिता शेख सईद | ६५००/- + १८% GST |
| २ | काजी समिरोद्दीन पिता रईसोद्दीन | **७२००/- + १८% GST** |
| ३ | पठाण महेबुब खान हमीद खान | ७१००/- + १८% GST |
| ४ | राजेंद्र बाबुराव होळकर | ७०००/- + १८% GST |

प्रस्तुत प्रकरणात सर्वात जास्त बोली **काजी समिरोद्दीन पिता रईसोद्दीन** यांची असून त्यांनी प्रतिमाह भाडे रुपये ७२००/-+ १८% GST रक्कम रु.१२९६/- अशी एकूण रक्कम रु.८४९६/- ची

बोली लावली आहे त्यांच्या नावाने ०३ वर्षासाठी भाडेकरार करणे बाबत जिल्हा वक्फ अधिकारी, बीड यांनी शिफारस करुन अहवाल सादर केला आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मधील नियम १७ नुसार ३ वर्षापर्यत भाडेपट्टाकरारासाठी वक्फ मंडळाची मंजुरी आवश्यक असल्याने प्रस्तुत प्रकरण वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक:-१४** **मस्जिद अख्तरी बशीरगंज, बीड या वक्फ संस्थेच्या मालकीतील ८०० चौ.फुट जागा प्रस्तावित केल्याप्रमाणे ३ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास वक्फ मंडळाची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.**

## विषय क्रमांक:-१५

**मस्जीद (ईदगाह कदीम) जुनी ईदगाह, स्टेशन रोड, नांदेड च्या संबंधित एकुण २१ भाडेकरुंना १० वर्षासाठी भाडेपट्टा नुतनीकरणास मंजुरी देणबाबत.**

मस्जीद जुनी ईदगाह, नांदेड ची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/१०/१९७४ भाग-सी च्या अनुक्रमांक ५७ वर असुन मानीव नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदर वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत आहे. सिटीएस क्र. ३२४८ मस्जीद व ईदगाहची वक्फ मालमत्ता असुन एकूण क्षेत्र २३२x१९१ फुट ची तसेच मुतवल्ली मराठवाडा वक्फ बोर्डाची नोंद शासन राजपत्रामध्ये आहे. वक्फ मिळकती मध्ये जी+१ मध्ये मस्जीद अस्तित्वात असुन मस्जीद परिसरात एकूण २२ दुकाने, ५ घर, १ शाळा व जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड, कार्यालय आहे.

मस्जीदजुनी ईदगाह, नांदेड चे एकूण २२ भाडेकरु आहे त्यापैकी २१ लोकांनी एकत्रित अर्ज देवून त्यांचा भाडेपट्टा १० वर्षासाठी नुतनीकरण करण्याची विनंती केली आहे. वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ मधील तरतुदीनुसार वक्फ मालमत्ता भाडेवर देताना बाजार मुल्यांकनाचे २.५% प्रमाणे भाडे निश्चित करणे आवश्यक आहे. उपरोक्त वक्फ मालमत्तेचे बाजार मुल्यांकन प्रति चौरस मिटर दर रु.८४,०००/- आहे त्याप्रमाणे भाडे निश्चित करुन भाडेकरुंचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | भाडेकरु नांव | क्षेत्रफळ चौ.फुट | क्षेत्रफळ चौ.मि. | जुने दराने भाडे प्रतिमाह रुपये | रेडी रेकनर नुसार प्रस्तावित भाडे | भाडे केव्हा पर्यंत भरणा केले आहे | केंव्हा पासुन भाडेकरु आहे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | अब्दुल हकीम अब्दुल अलीम | २८१<br>१०८० | २६.११ (दुकान)<br>१००.३७ (गोडाऊन) | ५०० | ५३१९<br>११४०७ | डिसेंबर २०२२ | १९७४ |
| २ | सय्यद महेमुद सय्यद गालीब | ३४८ | २३ | ४९४ | ४७४९ | डिसेंबर २०२२ | १९७९ |
| ३ | श्रीमती वहीदा परवीन स.महेमुद | १६२ | १५.०६ | ३१२ | ३०९७ | डिसेंबर २०२२ | १९७९ |
| ४ | सय्यद महेमद सय्यद | ११२५ | ८७ | ९४८ | ८५९७ | डिसेंबर | १९७९ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | गालीब | | | | | २०२२ | जुना भाडेकरु सय्यद गालीब सय्यद नुर (मयत) |
| ५ | महंमद रशिद अब्दुल रऊफ | १७६ | १६.३६ | ७०० | २७५६ | डिसेंबर २०२२ | २००७ |
| ६ | महंमद निजामोद्दिन अब्दुल रहेमान | ३२३ | ३०.०२ | ७०० | ६१९५ | डिसेंबर २०२२ | १९९१ |
| ७ | शेख अकबर अब्दुल वहीद | ४९९८ | ४६.३ | ३५० | ९५५६ | डिसेंबर २०२२ | १९९१ |
| ८ | मो. साजीद हुसैन अहेमद हुसैन | २६० | २४.२ | ६०० | ४९८९ | डिसेंबर २०२२ | २००१ |
| ९ | महंमद खैरुद्दिन म.जैनुल आबेदीन | ९६ | ८.९२ | २८८ | १८३७ | डिसेंबर २०२२ | १९९३ |
| १० | मो.फैजान | १८५ | १७०२ | ४२० | ३५४९ | डिसेंबर २०२२ | १९९८ जुना भाडेकरु महंमद एकबाल महंमद रमजान (मयत) |
| ११ | महंमद अब्दुल्लाह शेख चाँद | १०८ | १० | २३४ | २०६५ | डिसेंबर २०२२ | १९९६ |
| १२ | अब्दुल नसीर अब्दुल बशीर | ११२८ | १०५ | १००० | ११९३२ | डिसेंबर २०२२ | १९८६ |
| १३ | महंमद सादेख महंमद उस्मान | २४० | २२.३ | ४८० | ४६०५ | डिसेंबर २०२२ | १९७६ |
| १४ | अब्दुल गफुर खान अब्दुल जब्बार | २४० | २२.३ | ३२० | ४६०५ | डिसेंबर २०२२ | १९८६ |
| १५ | सय्यद शरफोद्दिन स.खुदबोद्दिन | २४० | २२ | ४८० | ४५४३ | डिसेंबर २०२२ | १९९६ |
| १६ | सय्यद शरफोद्दिन स.खुदबोद्दिन | १०८८ | १०१ | १४८० | ११४७८ | डिसेंबर २०२२ | १९९६ |
| १७ | नवीद अहमद मुजीब अहेमद | १३२० | १२३ | १३०० | १३९७८ | डिसेंबर २०२२ | २०१० |
| १८ | महंमद रफी महंमद रमजान | २८० | २६ | ४८० | ५३८९ | डिसेंबर २०२२ | २०१० |
| १९ | अब्दुल सत्तार अब्दुल गफ्फार | ३०८<br>८१८.४ | २८.६२ (दुकान) ७६ (गोडाऊन) | १८०० | ५९१०<br>८६३७ | डिसेंबर २०२२ | १९७२ |
| २० | फयाज खान अमीर खान | ८० | ७.४३ | २०० | १५३४ | डिसेंबर २०२२ | १९९४ |
| २१ | अब्दुल खदीर अब्दुल बशीर | २१० | १९०५ | ४३२ | ४०२८ | डिसेंबर २०२२ | १९८६ |

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ आणि वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ सुधारीत नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार जुने भाडेकरु यांना १० वर्षाकरीता भाडेपट्टा नुतनीकरण केल्यास वक्फ संस्थेच्या उतन्नात भरीव वाढ होईल. सध्या एकूण २२ भाडेकरु कडून वक्फ संस्थेला प्रतीमाह रु.१३,५१८/- इतके उत्पन्न प्राप्त होत आहे. बाजार मुल्यांकनाचे २.५% प्रमाणे भाडे निश्चित केल्यास रु.१,४४,५३३/- इतके उत्पन्न प्राप्त होणे अपेक्षित आहे.

वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मध्ये सन २०१५ व २०२० मध्ये करण्यांत आलेल्या सुधारीत नियम क्र. १८ (२) मधील तरतुदीनुसार १९९५ पासुन ताब्यात असलेल्या भाडेपट्टा धारकाच्या बाबतीत निविदा प्रकिया न राबविता १० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्याची तरतुद आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ आणि वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ (सुधारीत नियम २०२०) मधील तरतुदीनुसार ३ वर्षापेक्षा जास्त व ३० वर्षापर्यंतच्या भाडेपट्टा करार कालावधीसाठी राज्य शासनाची पुर्व मंजुरी आवश्यक आहे. सदर प्रस्ताव मान्यतेस्तव वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक:- १५** **मस्जीद (ईदगाह कदीम) जुनी ईदगाह, स्टेशन रोड, नांदेड या वक्फ संस्थेमध्ये १९९५ पासून भाडेतत्वावर असलेल्या भाडेकरुंना १० वर्षासाठी भाडेपट्टा नुतनीकरणास मंजुरी देण्यात येत आहे. वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम, २०१४ मधील नियम १८ अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदर ठराव पारित करण्यात येत आहे. सदर नियमातील अटी व शर्तीची पुर्तता करणे संबंधितांवर बंधनकारक राहील.**

## विषय क्रमांक:- १६

**दर्गाह सय्यद शाह हैदर अली निलंगा, लातुर येथील सर्वे नंबर २९८ एकुण क्षेत्र १०.९९ हे.आर पैकी दक्षिण बाजुची ३ एकर इतकी जमीन वापरासाठी ३० वर्षे कालावधीसाठी भाडेपट्टा मंजुर करणे बाबत.**

**(तपासणी सुची)**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| | **अ) वक्फ संस्थेचा तपशील** | |
| १ | वक्फ संस्थेचे नांव व नोंदणी क्रमांक | **दर्गाह हजरत सय्यद शाह हैदर अली निलंगा जि.लातुर MSBW/LTR/२४/२००७** |
| | मालमत्ता परिशिष्ट-१ मध्ये/कलम ३७ नुसार रजिस्टर मध्ये आहे किंवा कसे | **होय.** |
| ३ | वक्फ संस्थेचे मुतवल्ली/व्यवस्थापकीय सदस्य नियुक्त करण्यात आलेल्या आदेशाचा दिनांक | **वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या नियंत्रणात आहे** |
| ४ | मालमत्ता भाडेतत्वावर देण्याबाबत संस्थेच्या ठरावाची प्रत जोडली आहे किंवा कसे | **वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या नियंत्रणात आहे** |
| ५ | प्रस्ताव अधिकृत मुतवल्ली/व्यवस्थापकीय सदस्य | **जिल्हा वक्फ अधिकारी, लातूर** |

| | | |
|---|---|---|
| | यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आला आहे किंवा कसे | |
| **ब) मालमत्तेचा तपशील** | | |
| ६ | भाडेतत्वावर द्यावयाच्य जागेचे एकूण क्षेत्रफळ (चौ.मी.) | **३ एकर जमीन** |
| ७ | रेडीरेकनर रेट (प्रति. चौ.मी.) | **७५०/- प्रति चौ.मी.** |
| ८ | मालमत्तेची किमान राखीव किंमत | **रु.९१,०३५/- प्रतिवर्ष** |
| **क) जाहिर प्रकटनाचा तपशील** | | |
| ९ | राष्ट्रीय वृत्तपत्राचे नांव व प्रगटनाचा दिनांक | **दैनिक भासकर**<br>**दिनांक १९/०८/२०२३** |
| १० | विभागीय/स्थानिक वृत्तपत्राचे नांव व प्रगटनाचा दिनांक | **दैनिक मराठवाडा नेते मराठी**<br>**दैनिक एशिया एक्सप्रेस ऊर्दु**<br>**दिनांक २५/०८/२०२३** |
| ११ | जाहिर प्रगटनामध्ये खालील बाबींचा समावेश आहे किंवा कसे | **आहे.** |
| | i) जागेचे एकूण क्षेत्रफळ व अचूक दिशानिर्देश | **सर्वे नंबर २९८ एकुण क्षेत्र १०.९९ हे.आर पैकी दक्षिण बाजुची ३ एकर**<br>**पुर्व : रोड**<br>**पश्चिम : रोड**<br>**उत्तर : सर्वे नं.** 298<br>**दक्षिण : रोड** |
| | ii) ज्या कारणासाठी मालमत्ता भाडेपट्ट्याने द्यावयाची आहे त्याबाबतचा तपशील (व्यावसायिक/शैक्षणिक/धार्मिक/ कृषी विषयक कामे, इत्यादी) | **शैक्षणिक** |
| | iii) प्रस्तावित भाडेकराराचा कालावधी (वर्षे) | **३० वर्षे** |
| | vi) किमान राखीव किंमत | **रु.९१,०३५/- प्रतिवर्ष** |
| **ड) लिलाव प्रक्रियेचा तपशील** | | |
| १२ | लिलाव प्रक्रियेत भाग घेणाऱ्या निविदाधारकांची संख्या | 1) **इस्माईल पाशामियॉ लदाफ**<br>2) **मुल्ला फतरु महेबुब**<br>3) **शेख सुल्तान बशीर**<br>4) **देशमुख अ.बासीद अ.सत्तार** |
| १३ | सर्वोच्च प्राप्त किंमत | **रु. १,५१,०००/- प्रतीवर्ष + १८% GST** |
| १४ | सर्वोच्च किंमत देणाऱ्या निविदाधारकाचे नांव | **देशमुख अ.बासीद अ.सत्तार रहेमानिया तालीमी सोसायटी,** |

| | | |
|---|---|---|
| | | **निलंगा जि.लातुर** |
| १५ | जुन्या भाडेकरूने निविदा प्रक्रियेत भाग घेतला आहे का | **होय.** |
| १६ | असल्यास, सर्वोच्च बोली रकमेत मालमत्ता भाडेतत्वावर घेण्यास जुना भाडेकरू सहमत आहे का? | **होय.** |

दर्गाह हजरत सय्यद शाह हैदर अली निलंगा जि.लातूर या वक्फ संस्थेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२४/४/१९८० ता.उस्मानाबाद भाग-क च्या अनुक्रमांक -१ वर असुन नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेच्या संबंधित वक्फ मिळकत सर्वे नंबर २९८ एकुण क्षेत्र १०.९९ हे.आर पैकी दक्षिण बाजुची ३ एकर इतकी जमीन ३० वर्षे कालावधीसाठी शैक्षणिक वापराकरीता भाडेपट्टयावर लिलावाद्वारे देणेबाबत वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ सुधारीत नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे निविदा प्रक्रिया पुर्ण करुन प्रस्ताव वक्फ मंडळाची मंजुरीसाठी दि.२०/०१/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावार वक्फ मंडळाने खालील प्रमाणे ठराव पारित केले आहे.

**(ठराव क्र.१० :-** सदर मालमत्ता भाडेतत्वावर देण्यासाठी पुन:श्च निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. यासाठी संबंधीत जिल्हयातध्ये सर्वात जास्त खप असलेल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी. सर्व जाहीराती सन्माननीय सदस्यांना कळविण्यात याव्यात.)

उपरोकत प्रकरणी वक्फ मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार सदर मालमत्ता भाडेपट्टयावर देण्यासाठी पुन:श्च निविदा प्रक्रिया राबवुन बंद पाकिटात निवदा मार्गविण्यात आले होते. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **वक्फ संस्थेचे नांव** | **भाडेपट्टयाने दयावयाच्या जमीनीचा तपशिल** | **बाजार मुल्यांकन** | **वृत्तपत्रात प्रसिध्दी** | **निविदेत भाग घेणा-यांची संख्या** | **बोली भाडे प्रतीवर्ष** | **पात्र निविदा धारकाचे नांव** |
|---|---|---|---|---|---|---|
| दर्गाह हजरत सय्यद शाह हैदर अली निलंगा जि.लातूर | सर्वे नंबर २९८ एकुण क्षेत्र १०.९९ हे.आर पैकी दक्षिण बाजुची ३ एकर जमीन | प्रती एकर रु.३० लक्ष | **दैनिक भासकर दि.१९/०८/२०२३ दैनिक मराठवाडा नेते, मराठी**<br>**दैनिक एशिया एक्सप्रेस, ऊर्दु दि.२५/०८/२०२३** | ०4 | **१) १५१०००/-**<br>२) ११८०००/-<br>३) ११४०००/-<br>४) **१५००००/-**<br>**+ १८% GST** | देशमुख अब्दुल बाशीद अब्दुल सत्तार रहेमानीया तालीमी सोसायटी, निलंगा लातूर |

उपरोक्त प्रकरणी रहेमानीया तालीमी सोसायटी निलंगा तर्फे अब्दुल बाशीद अब्दुल सत्तार देशमुख यांनी सर्वात जास्त बोली वार्षीक भाडे रक्कम रु.१,५१,०००/- ची लावली आहे. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षा पर्यंतच्या भाडेकरारासाठी राज्य शासनाची पूर्व मंजुरी आवश्यक असल्याने प्रस्तुत प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविणे बाबत वक्फ मंडळाची मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १६:-** **दर्गाह सय्यद शाह हैदर अली निलंगा, लातुर येथील सर्वे नंबर २९८ एकुण क्षेत्र १०.९९ हे.आर पैकी दक्षिण बाजुची ३ एकर इतकी जमीन शैक्षणिक वापरासाठी ३० वर्षे कालावधीसाठी भाडेपट्टा मंजुर करण्यास वक्फ मंडळाची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.**

## विषय क्रमांक १७:-

**मदीना मस्जीद मौजे पुसद ता. पुसद जि. यवतमाळ या वक्फ संस्थेच्या मालकीच्या सर्वे नं. ५४/२(जुना सर्वे नं.१३२ ) बाबत**

मदीना मस्जीद मौजे पुसद ता. पुसद जि. यवतमाळ ही वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे मानिव नोंदणीकृत असुन तीचा नोंदणी क्र. MSBW/YTM/११३/२०१२ असा आहे. सदर वक्फ संस्थेच्या मालकीची १० एकर जमीन अवैधपने विक्री होत असल्याची तक्रार दि. २२.०७.२०२२ रोजी प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सदर जमिनीची होत असलेली अवैध खरेदी विक्री तात्काळ रद्द करण्याबाबत तहसिलदार, पुसद तसेच तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख, पुसद यांना या कार्यालयाच्या दि. २७.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

या कार्यालयाच्या दि. २७.०७.२०२२ रोजीच्या पत्रा विरुध्द मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे वक्फ अर्ज क्र. ४२/२०२२ दाखल करण्यात आला.

त्यामध्ये मा. न्यायाधिकरणांनी दि. १४.११.२०२२ रोजी अंतिम आदेश पारीत केले असून या कार्यालयाचे दि. २७.०७.२०२२ रोजीच्या पत्र रद्द बात ठरविले आहे. तसेच तक्रार अर्जाच्या अनुषंगाने संबंधीतांना सुनावणीची संधी देवुन निर्णय घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

मा. न्यायाधिकरणाच्या आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी दि. २७.०४.२०२३ व दि. १५.०६.२०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समक्ष संबंधीतांची सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणी तसेच संबंधीतांनी सादर केलेले लेखी युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुत प्रकरणी खालील बाबी निदर्शनास येत आहेतः-

१. मदीना मस्जीद ही वक्फ संस्था बी-५० या क्रमांकाने धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणीकृत होती.
२. सदर वक्फ संस्थेची मालमत्ता सर्वे नं. १३२ येथे एकुण ३१ एकर २८ गुंठे इतकी होती.
३. सदर वक्फ संस्थेच्या मालकीची १० एकर जागा वक्फ संस्थेने दि. १४.०४.१९५९ रोजी विक्री केली.

४. सदर विक्री ही तत्कालीन मुंबई सार्वजनिक व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार संबंधित प्राधिका-याची मान्यता घेऊन करण्यात आलेली असल्याचे विक्री पत्रात नमुद करण्यात आलेले आहे.

५. सदर विक्री ही सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने सन १९५० मध्ये करण्यात आलेली असल्याचे वक्फ संस्थेने दि. १३.०३.२०२३ रोजीच्या पत्रात नमुद केले आहे.

६. प्रस्तुत प्रकरणी संबंधित प्राधिकरणांनी दिलेल्या मान्यतेची/आदेशाची प्रामाणित प्रत उपलब्ध करुन देणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधितांना सुनावणीदरम्यान आदेशित केले होते. तथापि, सदर आदेशाची प्रमाणित प्रत संबंधितांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

७. सदर वक्फ संस्थेच्या धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील नस्तीची प्रमाणित प्रत उपलब्ध करुन देणेबाबत सहायक धर्मादाय आयुक्त, यवतमाळ यांना या कार्यालयाच्या दिनांक २५.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि, सदर प्रत देखील अद्याप उपलब्ध झालेली नाही.

उपरोक्त नमुद तक्रारी बाबत निर्णय घेण्यासाठी सदर प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

## ठराव क्रमांक १७:- सदर विषय पुढे ढकलण्यात येत आहे.

## विषय क्रमांक १८:-

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी वक्फ अधिनियम, १९९५, जमीन आणि महसूल संबंधित कायदेशीर बाबी हाताळण्यात तज्ञ असलेल्या कायदेशीर सल्लागार/ फर्म/ कंपनी ची नियुक्ती करणेसंदर्भात निविदा मंजुर करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी वक्फ अधिनियम, १९९५, जमीन आणि महसूल संबंधित कायदेशीर बाबी हाताळण्यात तज्ञ असलेल्या कायदेशीर सल्लागार/फर्म/कंपनी ची नियुक्ती करणेबाबत वक्फ मंडळाच्या मान्यतेनुसार वक्फ कायदा, १९९५, जमीन आणि महसुल संबंधित बाबी, फौजदारी प्रकरणे, ट्रस्ट किंवा मंडळांना सल्ला देण्याचा व्यापक अनुभव असलेल्या सल्लागार/फर्म/कंपनीकडून ई-निवीदा माध्यमातुन दि.२२/०५/२०२३ पर्यंत निविदा सादर करण्यासाठी दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात निविदा जाहीर प्रगटन दि.३०/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आले होते. परंतु शासन नियमाप्रमाणे किमान निवीदा प्राप्त न झाल्यामुळे सदरील निविदेस दि.२९/०५/२०२३ दि.६/६/२०२३, दि.१४/०६/२०२३ व दि.२२/०६/२०२३ रोजी पर्यंत ४ वेळ मुदत वाढ देण्यात आली परंतु अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील एकच निविदाकारांनी भाग घेतला असल्याने फेर निविदा मागविण्यात आली.

दि.२२/०८/२०२३ रोजी दुसरी वेळ दैनिक सकाळ या राष्ट्रीय वर्तमानपत्रात निविदा जाहीर प्रगटन प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आली होती. परंतु पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे प्रथम मुदतवाढ दि.२९/०८/२०२३, दुसरी मुदतवाढ दि.६/९/२०२३ देण्यात आली. परंतु अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखील एकच निविदाकारांनी भाग घेतल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी दि.१/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील खरेदी नियम पुस्तिकेतील परिच्छेद ४.४.३.१ येथील तरतुद प्रमाणे निविदा उघडण्यात आली आहे.

वक्फ मंडळास विधी सल्लागारांची नितांत आवश्यकता आहे पहिल्या निविदेस पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने फेरनिविदा करण्यात आली आहे. फेरनिविदेमध्ये देखील २ मुदतवाढ देऊन देखील एकच निविदा प्राप्त झाली आहे. निविदाकारांना पुरेशा संधी देण्यात आलेल्या आहेत. वक्फ मंडळाच्या कामाची निकड व खरेदी धोरणातील तरतुदी विचारात घेता ई-निविदा माध्यमातुन प्राप्त झालेली परिनाम लॉ असोसीएट्स, मुंबई यांची निविदा दि.७/९/२०२३ उघडण्यात आली आहे. त्यांचे दर खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | काम वस्तुचे वर्णन | प्रमाण संख्या | युनिट्स | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| प्रति वर्ष (एका वर्षासाठी) | | | | | |
| १ | टिम लिडर | १ | प्रति युनिट प्रति वर्ष | रु. १६,२०,०००/- | रु. १६,२०,०००/- |
| २ | सहयोगी | १ | प्रति युनिट प्रति वर्ष | रु. १०,२०,०००/- | रु. १०,२०,०००/- |
| १ टिम लिडर व १२ सहयोगी यांच्या करीता प्रति वर्ष फी | | | | १,३८,६०,०००/- | |

उपरोक्त निविदेस मान्यता देणेस प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १८:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळासाठी कायदेशीर सल्लागार/ फर्म/ कंपनी ची नियुक्ती करणेसंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेस अनुसरुन परिनम लॉ असोसीएट्स, मुंबई यांची निविदा मंजुर करण्यात येत आहे.**

## (विधी विभाग)

**विषय क्रमांक १९:- ॲड. जावेद आर शेख यांची मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांमध्ये विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करणे बाबत.**

मा. सर्वोच्च न्यायालय येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळासंबंधीत जवळपास २०० प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच दर महिन्याला नविन प्रकरणे न्यायालयात दाखल होत असतात. सदर प्रकरणामध्ये प्रत्येक वेळी वकीलांची नेमणुक करावी लागते. प्रत्येक प्रकरणांमध्ये वेंगवेगळे वकील नियुक्त करण्यात आलेले असल्याने सुनावणीच्या वेळी त्यांच्या समवेत समन्वय करण्यात अडचणी येतात. त्यामुळे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची बाजू न्यायालयात प्रभावीपणे मांडली जात नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल होणा-या महत्वपुर्ण प्रकरणी विशेष समुपदेशी यांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावित होते.

ॲड. शेख यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची गेली अनेक वर्ष न्यायालयात बाजू मांडलेली आहे. सबब, ॲड. जावेद शेख यांची मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल होणा-या महत्वपुर्ण प्रकरणी प्रति सुनावणी रु १,५०,०००/- या दराने विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळासमोर मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

सदरहू प्रकरणात दि. ३०.०८.२०२३ रोजी खालील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला आहे.

**ठराव क्रमांक १७**

**" मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल होणा-या महत्वपुर्ण प्रकरणी ॲड. जावेद शेख यांची विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यांचे मानधन मु.का.अ. यांनी वाटाघाटी करुन निश्चित करुन सदर बाब मंडळाच्या निदर्शनास आणावी."**

उपरोक्त ठरावनुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ॲड. जावेद आर शेख यांच्याशी वाटाघाटी करुन त्यांना प्रति सुनावणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रकरणात रु १ लाख इतके मानधन निश्चित केले आहे. सदर बाब मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक १९:-** **ॲड. जावेद आर शेख यांची मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांमध्ये विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्यास तसेच त्यांना प्रति सुनावणी रु १ लाख इतके मानधन निश्चित करण्यास वक्फ मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतचा वेळोवेळी आढावा घ्यावे.**

**विषय क्रमांक २०:-**

अडॅ. शेख अशफाख अहमद इकबाल अहमद रा. नांदेड यांनी दि. 14.09.2023 रोजी अर्ज देवुन विनंती केली आहे की, त्यांना वक्फ मंडळाच्या नांदेड जिल्ह्याचे पॅनलवर वकील म्हणुन नियुक्ती मिळणे बाबत विनंती करुन निद्रशनास आणून दिले आहे की, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या पॅनल ॲडव्होकेटच्या नियुक्ती बाबत जाहीरात दिले होते त्यामध्ये दि. 28.10.2021 रोजी महाराष्ट्र राज्य वक्फ मडळाच्या वतीने मुलाखती घेण्यात आल्या सदर दिवशी अडॅ. शेख अशफाख अहमद इकबाल अहमद त्यांची प्रकृती बरी नसल्याने ते मुलाखतीस उपस्थित राहु शकले नाहीत. तसेच सद्या नांदेड येथे वकील पॅनलवर कोणतेही वकील नियुक्त करण्यात आलेले नाही.

अडॅ. शेख अशफाख अहमद इकबाल अहमद, यांनी वकीलीचा अनुभव २३ वर्षाचा असुन ते महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या नांदेड पॅनलवर काम करण्यात इच्छुक असल्याने त्यांना सहकारी न्यायालय, महसुल विभाग औद्योगिक न्यायालयात एक वर्षाचा कामाचा अनुभव आहे. तसेच वकीलीचा अनुभव २३ वर्षाचा असुन त्यांनी संमती दिली आहे. करिता सदरहू अर्जदाराची पॅनल ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती बाबत प्रस्ताव सविनय सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २०:-** **अडॅ. शेख अशफाख अहमद इकबाल अहमद रा. नांदेड यांनी दि. १४.०९.२०२३ रोजी दिलेल्या अर्जास अनुसरुन त्यांची वक्फ मंडळाच्या पॅनलवर नियुक्ती करण्यास सहमती प्रदान करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २१:-** **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात मा. सर्वोच्च न्यायालयाने वर्ग केलेल्या प्रकरणात सुनावणी बाबत सिनियर ॲडव्होकेटची नियुक्तीस वाढ देणे बाबत.**

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल विशेष अनुमती याचिका क्र. ३१२८८-३१२९०/२०११ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २०.१०.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार वक्फ मंडळ कार्यालयाकडे अंदाजीत १९० याचिका दाखल झालेल्या आहेत. सदर याचिका विहीत कालमर्यादेत निकाली काढण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. सदर कामासाठी मंडळास कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. ईकबाल हुसैन यांची वक्फ मंडळाच्या दि. २०.०१.२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. २४ अन्वये ३ महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्तीस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून मंडळाच्या दिनांक ०५/०७/२०२३ ठराव क्र. (१६) अन्वये दि. ०१/०७/२०२३ ते ३१/०८/२०२३ पर्यंत (२) महिन्याच्या कालावधीसाठी शेवटची मुदतवाढ देण्यात आली होती. सद्यस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मंडळात दाखल

याचिकाच्या सुनावणीचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. सबब, त्याकामासाठी ॲड. ईकबाल हुसैन यांची नियुक्ती करण्यासाठी वक्फ मंडळाच्या निर्णयासाठी सादर.

**ठराव क्रमांक २१:-**

**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मंडळात दाखल याचिकाच्या सुनावणीचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. सबब, या कामासाठी ॲड. ईकबाल हुसैन यांच्या दि. ०१.०९.२०२३ ते ३१.१२.२०२३ पर्यंत ४ माहिन्याच्या कालवधीसाठी नियुक्तीस वक्फ मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

## (ऑडिट विभाग)

**विषय क्रमांक २२:-**

**वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ४४ अनुसार वक्फ संस्थांच्या वार्षिक अंदाजपत्रकांना मान्यता देणे बाबत.**

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४४ येथील तरतुदीनुसार वक्फ संस्थांनी दरवर्षी वार्षिक अंदाज पत्रक वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक आहे. सदर अंदाज पत्रकामधील जमा/खर्च येथील बाबींमध्ये बदल करण्याचे वा त्या रद्द करण्याचे अधिकार वक्फ मंडळास आहेत. तथापि, सदर तरतुदीनुसार कोणत्याही वक्फ संस्थे मार्फत वार्षिक अंदाज पत्रक सादर करण्यात येत नव्हते. सबब, राज्यातील सर्व नोंदणीकृत संस्थांना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा मार्फत नोटीस बजावण्यात आल्या असुन वक्फ संस्थांचे अंदाज पत्रके सादर करणे बाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त नोटीशीस अनुसरून, राज्यातील १३० वक्फ संस्थांनी वाषीक अंदाज पत्रके सादर केलेली आहेत. सदर अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २२:- उपरोक्त वक्फ संस्थांच्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २३:-**

**मौलवीवाडा मस्जिद ट्रस्टची नोंदणी रद्द करणेबाबत (श्री. शाह फारुक अन्वर, मा. सदस्य यांची सूचना)**

मौलवीवाडा मस्जिद ट्रस्ट धुळे ही ट्रस्ट धर्मादार आयुक्त कार्यालयाकडे B-७४ या क्रमांकाने नोंदणीकृत आहे. सदर ट्रस्ट दिनांक ३०.१२.२००४ रोजीच्या राजपत्रान्वये वक्फ घोषित झालेली असून सन २०१४ मध्ये ट्रस्टची नोंदणी (MSBW/DLE/१३१/२०१४) या कार्यालयाकडे करण्यात आलेली आहे. सदर संस्थेची मालमत्ता खाजगी इनाम असल्याने वक्फ संस्थेची मंडळाकडील नोंदणी रद्द करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची शिफारस मा. सदस्य यांनी केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी नमूद करण्यात येते की, वक्फ मंडळाच्या नोंदणीविरुद्ध मा. वक्फ न्यायाधिकरण येथे ३८/२०१४ दाखल असून मा. न्यायाधिकरणाने वक्फ मंडळाच्या नोंदणीस स्थगिती

दिली आहे तसेच सद्यस्थितीत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेशित केलेले आहे. सदर प्रकरणाची वस्तुस्थिती मा. मंडळाच्या अवलोकनार्थ सादर.

**ठराव क्रमांक २३:- प्रस्तुत प्रकरणी विधी सल्ला घेवुन सदर प्रकरण पुढील सुनावणी मध्ये ठेवण्यात यावा.**

## विषय क्रमांक २४:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात दाखल होत असलेले आक्षेपा बाबत.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणी, योजना, फेरफार तसेच इतर म्हत्वाचे कामे पार पाडण्यात येत असून वक्फ मंडळात वक्फ संस्थांच्या फेरफार, योजना मंजुरी व इतर सर्व कामा मध्ये अपु-या स्वरुपाचे आक्षेप, विना फी भरलेले, तथ्यहीन व बिनाबुढीचे आक्षेपासोबत आधार कार्ड विना दाखल करत असल्यामुळे वक्फ मंडळाच्या सुनावणीमध्ये या कारणाने प्रकरणे रखडले जातात याचा फायदा आक्षेप धारकास विनाकरण होत आहे याचा परिणाम वक्फ संस्थांच्या सुरळीत व्यवस्थापनावर होत आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने यापुर्वी दि. १७.०५.२०२२ च्या बैठकी मध्ये ठराव क्र. १९/२०२२ अन्वये सर्व आक्षेप फी रुपये १०००/- आकारण्यासाठी सहमती दिली आहे. यापुढे सर्व आक्षेप धारकाकडुन प्रति व्यक्ती रुपये ५०००/- आकारण्यात यावा तसेच आधार कार्ड सोबत संलग्ण करणे अनिवार्य करणे आवश्यक असून सदर प्रस्ताव मंडळाच्या निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २४:-**

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडील सुरु असलेल्या प्रकरणांमध्ये विहित कालावधीत दाखल होणा-या आक्षेपांसाठी प्रति आक्षेप अर्ज रुपये ५०००/- इतकी फी निश्चित करण्यात येत आहे.**

## मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने घेण्यात येणारे एनवेळचे विषय

## विषय क्रमांक २५ :-

**जुम्मा मस्जीद, निजामपुर ता.भिवंडी जि.ठाणेच्या संबंधित वक्फ मिळकत सि.टी.एस क्र.२०६ मध्ये वक्फ संस्थेच्या नावाने इमारत बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.**

**अर्जदाराचे नांव :अदनान कबीर कुवारी, चिफ ट्रस्टी जामा मस्जीद निजामपुर भिवंडी**

**तपास सुची**

| अ.क्र | तपशिल | शेरा |
|---|---|---|
| १ | अर्जाची पडताळणी करण्यात आलेली आहे? | होय. |
| २ | वक्फ संस्था वक्फ मंडळात नोंदणीकृत आहे? | MSBW/THN/१०८/२००९<br>दिनांक ०२/०७/२००९ |
| ३ | अर्जदार वक्फ संस्थेचा ट्रस्टी/सदस्य आहे? | होय. |
| ४ | वक्फ मालमत्तेची नोंद महसुली अभिलेख | सिटी सर्वे नं.२०६ |

| | | |
|---|---|---|
| | ७/१२/नमुना नं.८/मालमत्ता पत्रक/म्यु घर नंबर इत्यादी मध्ये आहे? | क्षेत्र १००.३० चौ.मि. |
| ५ | वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना मंजुर आहे? | होय. |
| ६ | वक्फ संस्थेकडून ऑडिट/वक्फ फंड भरणा करण्यात आला आहे? | होय. |
| ७ | वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी प्रस्तावित बांधकामासाठी ठराव घेतला आहे? | आहे. |
| ८ | अर्जदार यांनी प्रस्तावित बांधकाम जागाचे फोटो सादर केले आहे? | आहे. |
| ९ | प्रस्तावित बांधकाम क्षेत्रफळ? | क्षेत्र १००.३० चौ.मि. (G+४ रहिवासी इमारत) |
| १० | प्रस्तावित बांधकामाचे स्वरुप | नवीन बांधकाम |
| ११ | प्रस्तावित बांधकामाचा आराखडा आहे? | आहे. |
| १२ | प्रस्तावित बांधकामाचा अंदाजपत्रक खर्च | रु.२२,०४,१००/- |
| १३ | बांधकामासाठी कर्ज वगैरे घेण्यात आला आहे? | कर्ज घेण्यात आला नाही. सदरील इमारतीचे बांधकाम स्थानिक लोकांच्या चंदा वर्गणीतुन करण्यात येणार असल्याचे शपथपत्र वक्फ संस्थेचे चिफ ट्रस्टी, अदनान कबीर कुवारी, यांनी दिले आहे. |
| १४ | प्रस्तावित बांधकामासाठी सादर केलेले दस्ताऐवज खरे व बरोबर आहे याबाबत शपथपत्र दिले आहे? | आहे. |
| १५ | अर्जदाराने नाहरकत प्रमाणपत्राची प्रोसेस फी भरणा केली आहे? | -- |

उपरोक्त प्रकरणात अर्जदार यांनी दि.२९/१/२०२२ रोजी अर्ज दिला होता आवश्यक कागदपत्रांची पुर्तता त्यांनी दि.२६/१२/२०२३ रोजी केली आहे. तसेच प्र.जिल्हा वक्फ अधिकारी, ठाणे यांनी त्यांचे पत्र क्र.वक्फ/ठाणे/एसएनटी-१/९९/२०२३ दि.०९/०६/२०२३ अन्वये अहवाल सादर करुन जुम्मा मस्जीद, निजामपुर ता.भिवंडी जि.ठाणे च्या अतिरिक्त मिळकत सि.टी.एस क्र.२०६ मध्ये वक्फ संस्थेच्या नावाने इमारत बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र देण्याची शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ (१) (क) मधील तरतुदीनुसार वक्फचा संभाळ करण्यासाठी (जतन करण्यासाठी) देखभाल करण्यासाठी सर्वसाधारणपणे आवश्यक असतील ती सर्व कामे करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ६८ व्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ४२ (अ) नुसार मस्जीद, दर्गाह, कब्रस्तान, ईदगाह, आशुरखाना व इतर वक्फ संस्थांच्या दुरुस्ती/नुतनीकरण, संरक्षण भिंती, पेव्हर ब्लॉक, इदगाह वट्टा, जनाजा नमाज पठणसाठी शेड तसेच मोडकळीस आलेल्या वक्फाच्या अंदाज पत्रकीय खर्च रक्कम रु.२५ लाख पर्यंतच्या बांधकामासाठी नाहरकत

प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना प्रदान करण्यात आले आहे.

उपरोक्त बांधकामाचा खर्च रु.२२,०४,१००/- इतका असला तरी सदर बांधकाम इमारतीचा असल्याने वक्फ मंडळाची मान्यता आवश्यक असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ मधील तरतुदीनुसार ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मंजुरीसाठी ठेवणे बाबत आदेशास्तव सादर.

**ठराव क्रमांक २५ :-**

**जुम्मा मस्जीद, निजामपुर ता.भिवंडी जि.ठाणे ची वक्फ मिळकत सि.टी.एस क्र.२०६ मध्ये प्रस्तावित बांधकाम करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २६:- वक्फ संस्था दर्गाह हजरत बुऱ्हान शाह वली, परभणी या वक्फ संस्थेच्या मुतवल्लीस वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६४ अन्वये निलंबित करणे बाबत.**

वक्फ संस्था दर्गाह हजरत बुऱ्हान शाह वली, परभणी ही नोंदणीकृत वक्फ संस्था आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा बैठक दिनांक १७/०७/२०२१ रोजी दर्गाह हजरत बुऱ्हान शाह वली व इदगाह, परभणी ही वक्फ संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६५ अन्वये वक्फ मंडळाच्या रास्त नियंत्रणात घेणे बाबत ठराव मंजुर करण्यात आला होता. त्यानुसार वक्फ संस्था रास्त निगराणीत घेण्यासाठी दिनांक २८.०७.२०२१ रोजी आदेश पारित करण्यात आले होते. सदर आदेशाविरुध्द मा. वक्फ न्यायाधिकरण मध्ये वक्फ अर्ज क्र. २३/२०२१ दाखल झाला होता. मा. वक्फ न्यायाधिकरणाने दिनांक १३.१०.२०२२ रोजी मंडळाचे आदेश रद्दबातल ठरविले असून प्रकरण मंडळाकडे पाठवून संबंधितांची सुनावणीची संधी देवुन प्रकरण निकाली काढण्यात आदेशित केले आहे.

मा. वक्फ न्यायाधिकरण यांचे आदेश दिनांक १३.१०.२०२२ मधील आदेशान्वये वक्फ संस्थेचे व्यवस्थापन पाहत असल्याचा दावा करीत असलेल्या संबंधितांना सुनावणीची तसेच लेखी म्हणने मांडण्याची संधी देण्यात आली. तथापि, संबंधित मुतवल्ली हे वेगवेगळी कारणे नमूद करुन सुनावणी टाळण्याचा प्रयत्न करत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या समोर संबंधितांची दिनांक १८.१०.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुत प्रकरणी सुनावणी सुरु असतांना देखील मुतवल्ली वक्फ भाडेपट्टा नियम २०१४ मधील नियमांचे उल्लंघण करुन मुतवल्ली वक्फ मालमत्ता भाडेतत्वावर देत असल्याचे व अवैधपणे भाडे वसुल करित असल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व बाबी विचारात घेता, वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ६४ (५) येथील तरतुदीनुसार मुतवल्लीस निलंबित करण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव क्रमांक २६:-**

**वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ६४ अंतर्गत मुतवल्ली विरुद्ध कार्यवाही प्रस्तावित आहे. संबंधित मुतवल्ली यांना पुरेशा संधी देण्यात येऊनही त्यांनी अद्यापपर्यंत समाधानकारक खुलासा सादर केलेला नाही. तथापि, ते वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ ची अंमलबजावणी न करता वक्फ संस्थेच्या हिताविरुद्ध काम करित असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने सदर चौकशीची प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत कलम ६४ (५) अंतर्गत तरतुदीनुसार मुतवल्लीस निलंबित करण्यात यावे. वक्फ मालमत्तेच्या कायद्या प्रमाणे व्यवस्थापनासाठी कलम ३८ मधील तरतुदीनुसार प्रभारी जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांची प्रशासकिय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. तसेच कार्यालयीन कामासाठी एक लिपिकाची रोजंदारी तत्वावर नियुक्ती करण्यात यावी. प्रशासकीय अधिका-यास मुळ वेतनाच्या ५%. अधिकचा भत्ता देण्यात यावा. सदर खर्च वक्फ संस्थेच्या उत्पन्नातून अदा करण्यात यावा. या बाबतचे सविस्तर आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्गमित करावेत.**

**विषय क्रमांक २७:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळासाठी नियमित मुख्य कार्यकारी अधिका-याची नियुक्ती करणेबाबत**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे कार्यक्षेत्र हे संपुर्ण राज्यभर असून १४,००० पेक्षा जास्त वक्फ संस्थांचे व्यवस्थापन मंडळामार्फत करण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी हे कार्यालयाचे प्रशासकीय प्रमुख असून वक्फ मंडळाचे सचिव आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद जुन, २०२२ पासून रिक्त आहे. तेव्हापासून सदर पदावर अतिरिक्त कार्यभाराद्वारे अधिकारी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी नियमित मुख्य कार्यकारी अधिकारी नसल्याने मंडळाच्या कामात गतिमानता राखता येत नाही. तसेच मंडळाकडून विविध नाविण्यपुर्ण योजना राबविण्याचे प्रस्तावित असून नियमित मुख्य कार्यकारी अधिकारी नसल्याने त्या मध्ये अडचणी येत आहे. सबब, मंडळासाठी नियमित मुख्य कार्यकारी नियुक्त करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मंडळात चर्चा करण्यात आली असून मंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव क्रमांक २७:-**

**वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम २३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी १) श्री. मो.बा. ताशिलदार, उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग व २) श्रीम. बुशरा सय्यद, सह सचिव, विधि व न्याय विभाग यांच्या नावाची शिफारस करण्यात येत आहे. याबाबतचा प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करावा.**

**विषय क्रमांक २८:- वक्फ संस्था चिरागअली कब्रस्तान सोलापुर या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीस वक्फ अधिनिमय १९९५ चे कलम ६४ अन्वये निलंबित करणेबाबत.**

वक्फ संस्था चिराग अली कब्रस्तान सोलापुर ही वक्फ संस्था नोंदणीकृत असुन नोंदणी क्र. मरावमं/एस.एल.आर/५३/२००९ असा आहे. चिरागअली कब्रस्तान सोलापुरच्या विश्वस्तांनी वक्फ अधिनियम १९९५ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी त्यांना हटविण्यासाठी कलम ६४ अंतर्गत नोटीस पत्र क्र. मरावमं/अतियात/६४/आर.इ.जी.१५४/५१४१/२०२३ दिनांक १७/०८/२०२३ अन्वये देऊन सात दिवसात खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु, ॲड महेबुब बिलाल कोथंबिरे, सचिव -चिराग अली कब्रस्तान, सोलापुर यांनी दिनांक ३०/०८/२०२३ रोजी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७० संबधीचे चौकशीचे कागदपत्रे उपलब्ध झाल्यानंतर खुलासा देता येईल, असे नमुद केले होते. त्यास अनुसरुन या कार्यालयाचे पत्र दि. / /२०२३ अन्वये त्यांना संबंधीत कागपत्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

या कार्यलयाने चिराग अली कब्रस्तान, सोलापुर यांना विकास कामासाठी दिनांक ०२/०१/२०१० रोजी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. सदर नाहरकत प्रमाणपत्राची एक प्रत चिराग अली कब्रस्तान, सोलापुर यांनाही देण्यात आली होती. त्या नाहरकत प्रमाणपत्रामध्ये कथित स्वरुपात फेरफार व शब्दांची फेरबदल करुन सदर नाहरकत प्रमाणपत्र सोलापुर महानगरपालिकेत दाखल करुन स.न ९९ या जागेवर चिराग रेसिडेंसी या नावाने बिल्डींग बाधुन त्यातील फ्लॅट व शॉपचे खुल्या बाजारात विक्री झालेली आहे. सदर नाहरकत प्रमाणपत्राचा वापर सह दुय्यम निबंधक (वर्ग-२) सोलापुर उत्तर यांच्या कार्यालया दस्त नोंदणीसाठी केला आहे. या कार्यालयाने दिलेले नाहरकत प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत तसेच वक्फ संस्थेने नाहरकत प्रमाण पत्रात फेरफार व शब्दांची फेरबदल केलेल्या पत्रांची प्रत या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/अतियात -३/५८१५/२०२३ दिनांक ११/०९/२०२३ पत्राद्वारे पाठविण्यात आले होते.

वक्फ संस्था चिराग अली कब्रस्तानमध्ये या कार्यालयाचे पत्र दिनांक ०३/१०/२०२३ अन्वये सुनावणीसाठी १८/१०/२०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीदरम्यान देखील संबंधितांनी समाधानकारक उत्तर दिलेले नसून सुनावणी टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर वक्फ संस्थेच्या **व्यवस्थापकीय समितीविरुद्ध अनेक आरोप असून त्याची चौकशी सुरु आहे. तथापि, व्यवस्थापन समिती** वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ६४ (५) येथील तरतुदीनुसार **व्यवस्थापन समितीस** निलंबित करण्याचे प्रस्तावित आहे.

## ठराव क्रमांक २८:-

**वक्फ अधिनियम, १९९५ मधील कलम ६४ अंतर्गत मुतवल्ली/व्यवस्थापकीय समितीविरुद्ध कारवाई प्रस्तावित आहे. संबंधितांना पुरेशा संधी देण्यात येऊनही त्यांनी अद्यापपर्यंत समाधानकारक खुलासा सादर केलेला नाही. याउलट ते चौकशीची कारवाई टाळाण्याचा प्रयत्न करीत आहे. सबब, सदर चौकशीची प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत कलम ६४ (५) अंतर्गत तरतुदीनुसार व्यवस्थापकीय समितीस निलंबित करण्यात यावे. वक्फ मालमत्तेच्या कायद्या प्रमाणे व्यवस्थापनासाठी कलम ३८ मधील तरतुदीनुसार प्रभारी जिल्हा वक्फ अधिकारी सोलापूर यांची प्रशासकिय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. तसेच कार्यालयीन कामासाठी एक लिपिकाची रोजंदारी तत्वावर नियुक्ती करण्यात यावी. प्रशासकीय अधिका-यास मुळ वेतनाच्या ५%. अधिकचा भत्ता देण्यात यावा. सदर खर्च**

वक्फ संस्थेच्या उत्पन्नातून अदा करण्यात यावा. या बाबतचे सविस्तर आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्गमित करावेत.

## विषय क्रमांक २९:- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्वे नं. २१० येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे फुटबॉल स्टेडियम बांधण्याबाबत.

छत्रपती संभाजीनगर येथील आमखास मैदानावर क्रिडा संकुल बांधण्याबाबत मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास व औकाफ) महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६.१०.२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस श्री. इम्तियाज जलिल, मा. सदस्य हे देखील उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर येथील आमखास मैदानावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिडा संकुल बांधण्याचे निदेश मा. मंत्री, अल्पसंख्यांक विकास व औकाफ यांनी संबंधितांना सदर बैठकीत दिले आहेत.

आमखास मैदान हे सर्वे नं. २१० मध्ये असून ती अधिसूचित मालमत्ता वक्फ आहे. सदर जाग़ेचा वापर सध्यादेखील मैदान म्हणूनच होत आहे. त्यामुळे तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिडा संकुल बांधण्यास वक्फ मंडळाने पुढ़ाकार घ्यावा, असा प्रस्ताव श्री. इम्तियाज जलिल, मा. सदस्य यांनी बैठकीत मांडला. सर्वे नं. २१० जाग़ेची मालकी, सध्याचा वापर व वक्फ अधिनियमातील कलम ५१ (१-अ) येथील परंतुक ह्या सर्व बाबींवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

## ठराव क्रमांक २९:-

**छत्रपती संभाजीनगर येथील सर्वे नं. २१० ही अधिसुचित वक्फ मालमत्ता असून त्याचा वापर मैदान म्हणूनच करण्यात येतो. सबब, त्या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिडा संकुल बांधण्यास तत्वत: परवानगी देण्याबाबत वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५१ (१-अ) येथील परंतुकान्वये मंडळास प्राप्त अधिकारानुसार सर्वानुमते ठराव पारित करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करुन घेण्यात यावा. सदर क्रिडा संकुल निर्माण करण्याबाबतचा Detailed Project Report मंडळाच्या पुर्वपरवानगी/मान्यतेसाठी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात यावा. क्रिडा संकुलाची मालकी व व्यवस्थापन हे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अखत्यारित राहील.**

**सदर ठरावाच्या अनुषंगाने प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना पाठवावा, अशी सूचना देखील मंडळाने केली.**

| अ. क्र. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | |
| २ | श्री. सय्यद इम्तियाज जलील<br>मा. लोकसभा सदस्य तथा सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |

| | | |
|---|---|---|
| ३ | डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. राज्यसभा तथा सदस्या,<br>म.रा.व.मं.औरंगाबाद | अनुपस्थित |
| ४ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ५ | मा. फारुख अन्वर शाह,<br>मा. विधान सभा सदस्य तथा मा. सदस्य,<br>म.रा.व.मं. औरंगाबाद | |
| ६ | मा. समीर गुलामनबी काझी,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ७ | मा. शेख हसनैन शाकीर,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ८ | मा. मौलाना सय्यद अतहर अली,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| | | |
| | श्री. मो. बा. ताशिलदार<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | |